गुरूवार, ३० नोव्हेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १११
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 30 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-111 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


# निकष बाजूला ठेवा, नुकसान झाले तेवढी मदत करा !

## आ. बाळासाहेब थोरात : अधिवेशनात सरकारला धारेवर धरू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक : मागील तीन चार दिवसांपासून राज्यात सुरु असलेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तूर, कापूस, कांदा, सोयाबीन या पिकांसह फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अगोदर खरीप वाया गेले, बहुतांश भागात रब्बीच्या पेरण्या झाल्या नाहीत. अनेक ठिकाणी पिके करपून गेली आहेत. त्यातच आता अवकाळी पाऊस आणि गारपिटीने उरले सुरली पिके आणि फळबागा पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्या आहेत. त्यामुळे सरकारने आता पंचनामे, पाहणी निकष यात न पडता शेतकऱ्यांचे जेवढे नुकसान झाले आहे तेवढी मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केली.**



आ. थोरात यांनी बुधवारी अवकाळी पाऊस आणि गारपीटग्रस्त नाशिक जिल्ह्यातील निफाड आणि चांदवड तालुक्यातील गावांना भेटी देऊन नुकसानीची पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. यावेळी त्यांच्यासोबत तहसीलदार, प्रशासकीय अधिकारी, माजी आमदार शिरीष कोतवाल, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष शरद अहिर, प्रदेश काँग्रेसचे सचिव ज्ञानेश्वर गायकवाड, जिल्हा अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे, चांदवड बाजार समितीचे सभापती संजय जाधव, आदींसह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. माध्यमांशी बोलताना थोरात म्हणाले की, राज्यातल्या बहुतांश भागात दुष्काळ आहे. अनेक ठिकाणी रब्बीच्या पेरण्या होऊ शकल्या नाहीत. अनेक गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. या संकटामुळे अगोदरच शेतकरी अडचणीत असताना आता झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीटीने शेतकरी उद्धवस्त झाला आहे. नाशिक जिल्हाला या गारपिटीचा मोठा फटका बसला असून एकट्या नाशिक जिल्ह्यात ३ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील पिके आणि फळबागा उद्धवस्त झाल्या आहेत. मका, सोयाबीन, धान, कांदा, टोमॅटो, कांदा रोपवाटीका, ज्वारी, द्राक्षे यांसह फळबागा गारपीटीने नष्ठ झाल्या आहेत. त्यामुळे शेतकरी कोलमडून पडला आहे. बँकांकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांनी या बागा जगवल्या होत्या. त्याला आधाराची आणि मदतीची गरज असून सरकारने पंचानामा, पाहणी, निकष याचे कागदी घोडे न नाचवता शेतक-यांचे जेवढे नुकसान झाले आहे तेवढी मदत तत्काळ द्यावी, असे थोरात म्हणाले.

**काँग्रेस पक्षाचे ३४ नेते ३४ जिल्ह्यात झालेल्या नुकसानीची करणार पाहणी**

अवकाळी पाऊस व गारपिटीने राज्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे . या नैसर्गिक संकटाने शेतकरी पुरता हवालदिल झाला आहे . अवकाळी पावसाने केलेल्या शेती व फळबागांच्या नुकसानाची पाहणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने नेत्यांवर जबाबदारी सोपवली असून काँग्रेस पक्षाचे ३४ नेते ३४ जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानीची पाहणी करणार आहेत . व त्यांच्याकडून मिळणा-या माहितीच्या आधारे शेतक-यांना मदत मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष सरकारकडे पाठपुरावा करणार आहे अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे .

# कांदा व्यापाऱ्यास तेरा लाखांचा गंडा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** लासलगाव / विंचुर येथील ज्ञानेश्वर संपत शिंदे या कांदा व्यापाऱ्याकडून खरेदी केलेल्या कांद्याचे तब्बल १३ लाख रुपयास दिल्ली येथील खरेदीदार व्यापाऱ्याने गंडा घातला असून याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात फसवणूकीच गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत हकीकत अशी की, दि.२४ ऑगस्ट



२०२१ ते २ सप्टेंबर २०२१ या काळात शामकुमार शर्मा रा. केशवपुर सब्जी मंडी, विष्णु गार्डन शॉप नंबर २८, ख्याला दिल्ली या व्यापाऱ्याने फिर्यादी व लासलगाव येथील कांदा व्यापारी ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मालकीचा एकुण १२१.६१० टन कांदा वेगवेगळ्या दराने एकुण किंमत रुपये २२,७१,७२३ चा कांदा माल खरेदी केला. त्या पैकी फिर्यादीस ०९,५२,५०० रुपये इको बँक नवी दिल्ली या बँकेकडून फिर्यादी शिंदे यांच्या एफ.डी.एफ.सी बँक खात्यावर पाठविले असुन त्यापैकी १३,१९,२२३ रुपये किंमतीच्या कांदा मालाचे पैसे अद्याप पावेतो दिले नाहीत व पैसे देण्यास टाळाटाळ करीत आहे. फिर्यादीस पैसे न मिळाल्याने फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन शामकुमार शर्मा याच्या विरोधात लासलगाव पोलीस ठाण्यात गुरनं २७८/२०२३ भा.दं.वि कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास स.पो.नि.राहुल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.उपनिरीक्षक किशोर भिकाजी पवार करीत आहेत.



# युवा संघर्ष यात्रा युवकांचा आवाज, तो दाबला जाऊ शकत नाही : आ. रोहीत पवार

आधुनिक केसरी न्यूज


**वसंत खडसे / रुपेश बाजड**

**रिसोड :** युवा संघर्ष यात्रा राज्यातील युवकांनी ऊभी केलेली एक मोठी चळवळ आहे. युवकांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न या संघर्ष पदयात्रेच्या माध्यमातून केला जात आहे. त्याला सामान्य जनतेकडून मोठया प्रमाणात उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. आणि हा प्रतिसाद पाहूनच आमचे सोशल मीडियाचे अकाऊंट सत्तेचा दुरुपयोग करून ब्लॉक केले आहे. खोट्या तक्रारी करुन आणि दबाव तंत्राचा वापर करत कोणी जर आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असेल तर हा आवाज महाराष्ट्रातील युवांचा आहे,तो दाबल्या जाऊ शकत नाही. असे प्रतिपादन युवा संघर्ष यात्रेचे प्रणेते आ. रोहीत पवार यांनी केले आहे.ते वाशिम जिल्ह्यातील आसेगावपेन येथे युवा संघर्ष यात्रा आली असती माध्यमांशी बोलत होते. पुढे बोलताना आ. पवार म्हणाले, स्पर्धा परीक्षेसाठी मोठया प्रमाणात शुल्क आकारून राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या युवकांची हे सरकार लूट करीत आहे. सरकार हे लोकांसाठी असते लोकांनकडून पैसे वसूल करण्यासाठी नाही..! आम्ही हा मुद्दा अधिवेशनात मांडल्यावर राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आम्हाला उत्तर दिले की, राज्यातील आताची युवा पिढी याविषयी सिरियस नाही. पण,आम्ही या युवा संघर्ष पदयात्रेतून त्यांना आताची युवा पिढी किती सिरियस आहे ते दाखवून देऊ. खरं सांगायचं झालं तर फडणविसांना राज्यातील युवांची गंभीर स्थिती अद्याप कळलीच नाही. असा टोला देखील यावेळी आ. रोहीत पवार यांनी लगावला आहे. आ. पवार यांनी पुणे येथून युवा संघर्ष पदयात्रेला सुरुवात केली असून, जवळपास 500 किलोमीटरचा प्रवास पुर्ण केला आहे.29 नोव्हेंबरला मराठवाड्यातून या यात्रेचे विदर्भात पदार्पण झाले आहे. यानिमित्ताने विदर्भाच्या वतीने वाशिम जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे, तसेच जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांच्या नेतृत्वात सदर यात्रेचे भव्य दिव्य स्वरूपात जंगी स्वागत करण्यात आले आहे. ही यात्रा 800 किलोमीटरची असून, युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या माध्यमातून आ. रोहीत पवार युवकांच्या विविध समस्या जाणून घेऊन, त्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडणार आहेत.

**बीडच्या जाळपोळ मागे एक शक्तीशाली हात . .**

बीड मधे झालेल्या जाळपोळ नंतर मी बीड येथे स्वत : गेलो होतो, त्याठिकाणी झालेल्या जाळपोळ प्रकरणात एका शक्तीशाली व्यक्तीचा हात होता .कारण सतत सात तास जाळपोळ सुरू होती . आणि पोलीस प्रशासन शांत होते .हे समजायला राज्यातील जनता दुधखुळी नाही .यामागे निश्चितच सत्तेतल्या एका व्यक्तीचा हात होता . मराठा आणि ओबीसी समाजात वाद निर्माण करुन वातावरण गढूळ करण्याचा तो एक अक्षम्य प्रकार तिथे जाणीवपूर्वक घडविण्यात आला आहे . लोकसभा निवडणुका लक्षात घेऊन राजकीय पोळी भाजण्यासाठी राज्यातील इतर भागात देखील असा प्रयत्न केला जाऊ शकतो . आशा प्रोफेशनल गुंडांना जनतेने समजून घ्यायला पाहिजे असे स्पष्ट मत यावेळी आ . रोहीत पवार यांनी व्यक्त केले आहे .




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

## ' मूर्ती ' घडवणारा शिल्पकार

**ज्ञानेश्वरीतच माउली म्हणतात हे विश्वची माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण पैं जाहला ।।**
आज ग्लोबलायझेशनमुळे जग जवळ आले आहे. आज आपल्याला कोणी म्हटले की हे विश्वची माझे घर असे म्हटलं तर फारसं आश्चर्य वाटणार नाही पण माउलींनी हे तेराव्या शतकातच सांगितलं आणि तेही अत्यंत व्यापक अर्थानं. हे जग म्हणजेच एक कुटुंब आहे. मी त्याचा एक भाग आहे. अशी मती स्थिर व्हायला हवी. म्हणजे सर्वाभूती परमेश्वराचे रूप पाहता येईल. गीतेत किंवा ज्ञानेश्वरीत जो कर्ममार्गाचा उपदेश केला आहे, तोच आपल्या सगळ्या संतांनी वेगवेगळ्या शब्दात आपापल्या परीने सांगितला. समर्थ रामदासांनी ' सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे ' असे सांगितलेच आहे. आपण शिक्षक असा की डॉक्टर, इंजिनिअर असा की शास्त्रज्ञ, सेवक असा वा साहेब, आपापले कर्म इतकं सुदर करू या की त्या कर्मरूपी फुलांचा सुंदर हार करून तो त्या सर्वात्मक ईश्वराला अर्पण करण्याजोगा होईल. त्यातच आपल्या जीवनाचे सार्थक होईल. एखादा मूर्ती घडवणारा शिल्पकार असतो, तो ओबडधोबड दगडातून सुंदर मूर्ती घडवतो. त्या दगडात ती मूर्ती लपलेली असतेच. शिल्पकार फक्त नको असलेला भाग काढून टाकतो आणि सुंदर शिल्प तयार होतं. एखादा जवाहिऱ्या एखाद्या मौल्यवान हिऱ्याला पैलू पडतो. मूळचाच तेजस्वी असलेला हिरा आता अधिक तेजाने लखलखतो.
जे आर डी ही अशा प्रकारची व्यक्ती होती. दगडातून मूर्ती घडवणारा शिल्पकार किंवा हिऱ्याला पैलू पाडणारा जवाहिऱ्या. त्यांच्या सहवासात जी जी माणसे आली, ती ती त्यांच्या व्यक्तिमत्वाने अशा तऱ्हेने प्रभावित झाली की त्यांचे आयुष्य बदलून गेले. या भागात अशाच काही व्यक्तींची माहिती आपण घेऊ या. प्रख्यात लेखिका आणि इन्फोसिस फाउंडेशनच्या प्रमुख सुधा मूर्ती या पूर्वाश्रमीच्या सुधा कुलकर्णी. त्या बंगलोरला इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षाला असतानाची ही गोष्ट. कॉलेजच्या नोटीसबोर्डवर एक नोटीस लागलेली होती. पुण्याच्या प्रख्यात टेल्को कंपनीत काही शिकाऊ इंजिनिअर्सची




भरती करायची आहे. त्यासाठी इच्छुकांनी अर्ज करावा. पुढे त्या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता आणि इतर निकष दिले होते. सर्वात शेवटी एक टीप दिलेली होती. या पदासाठी स्त्री उमेदवारांनी अर्ज करू नयेत. सुधा कुलकर्णी ही कोणत्याही तडजोडी न स्वीकारता अभ्यास करणारी आणि सतत आपली पहिली रँक टिकवून ठेवणारी एक बुद्धिमान तरुणी होती. नोटीसबोर्डावरची ही नोटीस पाहिल्यावर तिच्या तळपायाची आग मस्तकाला गेली.



## आनंदी पहाट

## परस्पर संवाद कौशल्याचे महत्त्व

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात व्यक्तींशी संवाद साधण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी परस्पर संवाद कौशल्ये महत्त्वपूर्ण असतात. मजबूत परस्पर संवाद कौशल्य असलेले लोक चांगले संबंध निर्माण करतात आणि इतरांसोबत चांगले काम करू शकतात. ते कुटुंब, मित्र, सहकारी आणि ग्राहकांना चांगले समजतात. लोक सहसा चांगले परस्पर संवाद कौशल्य असलेल्या सहकाऱ्यांसोबत काम करताना आनंद घेतात. परस्पर संवाद कौशल्यांच्या इतर फायद्यांमध्ये समस्या सोडवण्याची आणि चांगले निर्णय घेण्याची क्षमता समाविष्ट असते. परस्पर संभाषण कौशल्ये आणि इतरांना समजून घेण्याची क्षमता वापरून आपण सर्वोत्तम उपाय शोधू शकतो. संवादात सहभागी असलेल्या प्रत्येकासाठी सर्वोत्तम निर्णय घेऊ शकतो. अनेक नियोक्ते मजबूत परस्पर संवाद कौशल्यांसह कर्मचारी नियुक्त करण्याचा प्रयत्न करतात; कारण अशा व्यक्ती सहसा सांघिक काम चांगले करतात आणि त्यांच्या सहकाऱ्यांसह प्रभावीपणे सहयोग देखील करतात. परस्पर संवाद कौशल्य असलेले लोक त्यांच्या सभोवतालच्या लोकांशी संवाद साधण्याच्या आणि त्यांना प्रेरित करण्याच्या क्षमतेमुळे चांगले नेते बनू शकतात. सर्व आंतरवैयक्तिक कौशल्ये कामाच्या ठिकाणी लोकांना फायदेशीर ठरू शकतात, परंतु एक संघ म्हणून काम करणे आणि सामायिक उद्दिष्टे गाठण्यासाठी परस्परसंवाद साधणे ही गुरुकिल्ली आहे. सक्रियपणे ऐकणे म्हणजेच कोणीतरी बोलत असताना त्याच्याकडे पूर्ण लक्ष देण्याची आणि ते काय बोलत आहेत ते खरोखर समजून घेण्याची क्षमता असणे होय. सक्रियपणे ऐकणे म्हणजे केवळ कोण काय म्हणत आहे, याकडेच लक्ष देणे केवळ इतकेच नाही, तर त्यांच्या गैर-मौखिक संकेतांकडे देखील लक्ष देणे समाविष्ट आहे. तुम्ही ऐकत आहात आणि त्यामध्ये स्वारस्य आहे हे दर्शविण्यासाठी अधूनमधून प्रश्न विचारणे अथवा काही प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक असते.



आधुनिक केसरी

## चैतन्यात न्हाला | आत्माराम ||

चैतन्याचे रूप | चैतन्य दाविते ||
चैतन्य बोलते | किर्तनात ||१||
चालता बोलता | आठवे चैतन्य ||
तयाविन अन्य | काय पाहु ? ||२||
चैत्यन्याची बाधा | चैत्यन्ये जडली ||
चैतन्ये वाढली | प्रेम भक्ती ||३||
चैतन्याची खूण | चैतन्य सांगते ||
चैतन्य नांदते | अंतरात ||४||
सदूगुरू चैतन्य | लाभता ज्ञानाला |
चैत्यन्यात न्हाला | आत्माराम ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

स्त्री घेऊन आडवी । ऊर बडवी पोट बडवी ।
लाज सांडून गौरवी । लोकां देखतां ॥ ६१ ॥
म्हणे माझें बुडालें घर । आतां न करी हा संसार ।
दुःखें आक्रंदला थोर । घोर घोषें ॥ ६२ ॥
तेणें जीव वारयावेघला । सर्वस्वाचा उबग आला ।
तेणें दुःखें जाला । जोगी कां महात्मा ॥ ६३ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अकरव्य करव्य का, ज्ञान होय सत्संग ।
जीवन पथ गति शुद्ध है, अन्य उपाय गति भंग ।।५१ ।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/५१
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
कर्तव्य आणि अकर्तव्याचे ज्ञान सत्संगाद्वारे होते. यामुळेच जीवनपथाची गती शुद्ध रहाते अर्थात जीवन शुद्ध सत्य मार्गाने चालते. याव्यतिरिक्त सन्मार्गावर चालण्याचा दुसरा उपाय नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ५४वे

श्री काशी यात्रेला आरंभ झाला । पहिला पडाव तो नाशिकला । गोदावरीचे स्नान, सोहळा आटोपला । श्रीराम दर्शन घेऊन ।। १ ।।
नाशकाहून प्रयागला पोंचले । त्रिवेणी संगमी आईला नेले । स्नान तिजला घातले । मग वेणीमाधव पुजीला आईने ।। २ ।।
श्री महाराजानी प्रयागला । तीन दिवस मुक्काम केला । दर्शन घडले, दानधर्म झाला । हस्ते गीतामाईच्या ।। ३ ।।
काशीला येण्याआधी महाराजानी एक केले । मसूरियादीन शिवमंगल नामे शिष्यास पत्र लिहिले । येण्याचे कळवले त्यासी ।। ४ ।।
श्री महाराजांचे स्वागत करण्याला । काशी स्टेशनवर स्वतः मसूरियादीन आला । वाजतगाजत घेउनी गेला । महाराजांना गंगामहाली ।। ५ ।।
शिष्य मसूरियादीन काशीवाला । मोठा धनवान लौकिकवाला । काशी राजाशी याचा स्नेह मोठा भला । शिष्याची या पीडा दूर झाली श्रीमहाराज कृपेने ।। ६ ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## नामधारकाने टाळण्याच्या गोष्टी

आधुनिक केसरी

आपले विचार स्वार्थाचे नसावेत. स्वार्थामध्ये अभिमान नेहमी जागृत असतो. स्वार्थी मनुष्याला जगात सुख मिळणे कधीही शक्य नाही. नीतीची बंधने पाळा. परस्त्री मातेसमान माना. प्रपंचात एकपत्नीव्रताने राहणारे गृहस्थ लोक ब्रह्मचारीच होत. परद्रव्याची अभिलाषा धरू नका. त्याला विष्ठेसमान माना. दुसऱ्याच्या पैक्याचा अभिलाष धरण्यात आपला किती घात आहे याची नुसती कल्पनाच केलेली बरी. परस्त्री, परद्रव्य, यांच्याप्रमाणेच परनिंदा हीही अत्यंत त्याज्य आहे. परनिंदेने न कळत आपण आपलाच घात करीत असतो. परनिंदेमध्ये दुसऱ्यांच्या दोषांचे चिंतन होत असल्या कारणाने, ते दोष आपल्याकडे येत असतात. या सर्व गोष्टी सांभाळून तुम्ही नाम घ्या, नामाचे प्रेम तुम्हाला अगदी खात्रीने येईल. हे सर्व करीत असताना तुमचे आईवडील, बायकोमुले, यांच्या बाबतीत असलेले कर्तव्य करायला चुकू नका आणि त्या कर्तव्यात आसक्ती राहू देऊ नका. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता केलेले कर्म हे कर्तव्यच होय. ते कर्तव्य सांभाळून नीतिधर्माने वागून आपला प्रपंच करा,



आणि भगवंताचे स्मरण ठेवा. मग तुमचा प्रपंचच परमार्थरूप बनून भगवंताचे प्रेम तुम्हाला मिळेल हा माझा भरवसा तुम्ही बाळगा.
प्रपंच हा मिठासारखा आहे. भाकरीत मीठ किती घालायचे असते ? तर अगदी थोडे-फक्त चवीपुरते ! परंतु आपण मिठाची भाकरी करतो आणि त्यात परमार्थाचे चिमूटभर पीठ टाकतो; मग ती भाकरी खाता येईल का ? खरे समाधान मिळाल्यावर मनुष्य खेळासारखा प्रपंच करतो. त्यामध्ये तो वर चढला किंवा खाली पडला तरी सारखाच राहील; दुसऱ्याने डाव टाकल्यावर तो आपणही डाव टाकील ! पण डाव हरला किंवा जिंकला तरी त्याची त्याला पर्वा राहणार नाही.
प्रपंचात अनेक वस्तू आहेत, पण भगवंताजवळ एकच वस्तू आहे. प्रपंचात कितीही वस्तू आणल्या तरी त्या पुऱ्या पडत नाहीत, कारण एका वस्तूच्या आणण्यामध्येच दुसऱ्या वस्तूच्या आणण्याचे बीज आहे. पण भगवंताचे तसे नाही; भगवंताची वस्तू एकदा आणली की पुन्हा ती आणायला नको. समजा, एका दुकानात पुष्कळ माल भरलेला आहे; पण आपल्याला पाहिजे ती वस्तू तिथे नाही, म्हणजे आपल्या दृष्टीने तिथे काहीच नाही ! त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या मानसिक शक्ती असून तिथे भगवंत नसेल, तर त्या असून नसून सारख्याच समजाव्यात. परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावा. यातच जन्माचे सार्थक आहे.
११८. परमार्थात अहंकार मिसळला की तो प्रपंचच झाला. प्रपंचातला अहंकार दूर झाला की तो परमार्थच.

## समर्थ रामदास

चित्त निश्चिंत होतही। धन्य ते गायनी कळा।। मराठी (प्राकृत) भाषेचा अभिमानही समर्थ व्यक्त करतात. समर्थ लिहितात, ‘येक म्हणजी मऱ्हाठी काय। हे तो भल्यासी ऐको नये। ती मूर्ख नेणती सोय। अर्थान्वयाची।। लोहाची मांदूस केली। नाना रत्ने साठविली। ती अभाग्याने त्यागिली। लोखंड म्हणोनी। तैसी भाषा प्राकृत।।’ रामदासस्वामींची वाङ्मय संपदा अफाट आहे. मानवी जीवन सर्वांगाने समृद्ध व्हावे म्हणून समर्थांनी विविध विषयांवर चिंतनपर रचना केल्या. दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक, करुणाष्टके, शेकडो अभंग, स्तोत्रे, स्फुट रचना, रुबाया, सवाया, भारुडे, कविता, अनेक ओवीबद्ध पत्रे तसेच आरत्या त्यांनी रचलेल्या आहेत.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरूवार, ३० नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com | Adhunik Kesari





# माध्यमे बदलतात, बातमीचे स्वरूप नाही : डॉ. दुसाने

## विद्यापीठात स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेत केले मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** माध्यमे बदलतात मात्र बातमीचे स्वरूप कधीही बदलत नाही. कारण सत्य हा बातमीचा मुळ व मुख्य निकष आहे. बातमी ही सत्य असते, बातमीचा सोर्स मात्र पक्का असला पाहिजे. माध्यम कोणतेही असले तरी प्रेझेंटेशनमध्ये बदल होतो, बातमीत नाही. बातमीची भाषा त्या त्या माध्यमांप्रमाणे बदलत असते, असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील जनसवांद व वृत्तपत्र विद्या विभागात स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतीप्रीत्यार्थ मासिक व्याख्यानमालेचे बुधवारी 'बातमीचे बदलते स्वरूप' या विषयावर सोळावे पुष्प गुंफताना डॉ. मिलिंद दुसाने बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नामदेव सानप तर व्यासपीठावर प्रा. डॉ. संजीवकुमार सावळे, माहिती अधिकारी डॉ.मीरा ढास, डॉ. प्रभू गोरे, प्रा. बसवेश्वर बिरादर, प्रा. रमेश वाघ, विलास शिंगी, मुकेश मुंदडा, संदीप घंटे आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. दुसाने म्हणाले की, स्वातंत्र्योत्तर काळात स्वातंत्र्य आदोलनासाठी जनजागृती करणे ही पत्रकारितेची भुमिका होती. ती तत्कालिन सरकार विरोधी असायची. मात्र सरकार विरोध म्हणजे पत्रकारिता असे नाही. प्रिंट मीडियामध्ये जागेची, शब्दांची मर्यादा असते. कमी जागेत आशय व्यक्त करणारी बातमी द्यावी लागते. आकाशवाणीमध्ये ऑडिओ पाठवणे त्यावर एडिटिंग करणे ती बातमी किती वेळेची द्यायची हे महत्त्वाचे असते. दूरचित्रवाणीमध्ये काही बातम्या वेळ घालवण्यासाठी दाखवल्या जातात. प्रत्येक बातमी ही संपादकाच्या नजरे खालून जात असते. त्या बातमीची कोणावर तरी जबाबदारी असते. आता सोशल मीडियात पत्रकारिता करताना सर्वांनीच जबाबदारीचे भान ठेऊन काम केले पाहिजे, असे आवाहनही शेवटी डॉ. दुसाने यांनी केले.

कार्यक्रमाचा समारोप प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. परळी येथे मोहनलालजी बियाणी यांनी मराठवाडा साथी हे वृत्तपत्र सुरू केले. आज हे वृत्तपत्र विभागीय स्तरावर नावलौकिक पावले आहे. पत्रकारिता करताना शब्दांचा खेळ खेळता आला पाहिजे व बातमी लिहीत असताना समाजभानही असले पाहिजे, असे डॉ. सानप म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुमित भिंगारे, गायकवाड मॅडम आदींनी परिश्रम घेतले.



# कन्नड तालुक्यातील पिकांच्या नुकसानीची महसूल प्रशासनाकडून पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यात रविवारी रात्री सर्वत्र विजाच्या कडकडासह जोरदार पाऊस पडल्याने शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावुन घेतल्याने शेतकरी चिंता ग्रहस्थ दिसत आहेत नुकसान झालेल्या पिकांची पाहणी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार विदयाचरण कडवकर, कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनी केली. तालुक्यातील आठ महसुल मंडळापैकी दोन महसुल मंडळात अतिवृष्टी झाली. या अवकाळी पावसाने कापुस, मका, उस इत्यादी पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिरावला गेला आहे.

देवगाव रंगारी, ताडपिंपळगाव, देवळाना, देभेगाव, बोरसर परिसरात ऊस आडवा झाल्याचे दिसून आले आहे. कापूस, मका इत्यादी पिकाचे नुकसान सुध्दा दिसून आले आहे.



# मोदी सरकार अलर्ट

आधुनिक केसरी

चीनमध्ये आणखी एका रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. न्युमोनियासदृश हा आजार असून यामुळे लहान मुलांना श्वासोच्छवास घेण्यास अडचणी येत आहेत. चीनमध्ये वेगाने हा आजार लहान मुलांमध्ये पसरत असल्याने भारतानेही पूर्वतयारी सुरू केली आहे. तसंच, केंद्राने सर्व राज्यांना अलर्ट मोडवर राहण्यास सांगितले असून अशा आजारांना तोंड देण्यासाठी राज्यपातळीवर उपाययोजना आखण्याचे आदेश देण्यात आले आहेत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. केंद्र सरकारने राज्यांना श्वसनाच्या आजाराविरुद्धच्या तयारीचा आढावा घेण्यास सांगितले होते. आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारत सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि सध्या कोणताही धोका नाही. परंतु, या रोगावर देखरेख आणि नियंत्रण मिळवण्याकरता उपाययोजना आखण्याचे निर्देश सर्व राज्यांना देण्यात आले. उत्तर चीनमध्ये या रोगाचा प्रादुर्भाव सुरू झाला. निदान झालेल्या लहान मुलांमध्ये न्यूमोनियाचे क्लस्टर्स नोंदवले गेले आहेत. हे क्लस्टर्स मायकोप्लाझ्मा न्यूमोनियासारख्या विविध रोगजनकांच्या रक्ताभिसरणाचे असल्याचे येथील अधिकाऱ्यांनी सांगितले होते. परंतु, हा विषाणू कोविड १९ सारखा संसर्गजन्य नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केले. चमोली, उत्तरकाशी आणि पिथौरागढ हे तीन जिल्हे चीनच्या सीमेलगत आहेत. त्यामुळे उत्तराखंडमध्ये अलर्ट जारी करण्यात आला आहे अशी माहिती एएनआय या वृत्तसंस्थेने दिली आहे. संबंधित जिल्ह्यांमध्ये न्यूमोनिया आणि इन्फ्लूएंझा फ्लूच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी आयसोलेशन बेड/वॉर्ड, ऑक्सिजन बेड, आयसीयू बेड, व्हेंटिलेटर आणि ऑक्सिजन सिलिंडरची पुरेशी व्यवस्था करण्याचे निर्देश राज्यातील सर्व जिल्हा अधिकारी आणि मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे, अशी माहिती आरोग्य सचिवांनी दिली. गंभीर तीव्र श्वसन आजार च्या लक्षणांनी ग्रस्त असलेल्या लोकांवर दक्षता ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. जर सामुदायिक स्तरावर प्रकरणांचे क्लस्टरिंग आढळले तर त्यासाठी व्यवस्था करून रोगावर उपचार आणि नियंत्रण मिळवावे, असेही निर्देश देण्यात आले आहेत. राजस्थानच्या वैद्यकीय आणि आरोग्य विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव शुभ्रा सिंह यांनी अधिकाऱ्यांना रोगाच्या प्रतिबंध आणि उपचारांसाठी तीन दिवसांत कृती आराखडा तयार करण्यास सांगितले आहे. परिस्थिती सध्या चिंताजनक नाही असे सांगून त्या पुढे म्हणाल्या की वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी राज्यभरातील संसर्गजन्य रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी पूर्ण दक्षतेने काम केले पाहिजे, असे पीटीआयने वृत्त दिले आहे.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# मानसिक मागासलेपणामुळे सामाजिक तेढ

आधुनिक केसरी

**निवडणूक समोर आली म्हणजे जातीय, धार्मिक दंगली होणार नाहीत, जाती धर्माला मध्ये वाद निर्माण करून माणसं माणसापासून दुर होणार नाहीत तर निवडणुक कोणत्या मुद्यावर लढायची हा प्रश्न उपस्थित राहतो. म्हणून निवडून आली की लोकांना जातीच्या नावावर, धर्माच्या नावावर भावनिक बनवून पेटवले जाते. त्यानुसार निवडणूक अजेंडा बनवला जातो आणि शेवटच्या काही क्षणी नागरिकांना राष्ट्रभक्तीचे डोस पाजून देशभक्त बनवून मतपेटी भरण्याचा प्रयत्न केला जातो.**

कारण शिक्षण, रोजगार, महागाई, यावर बोलायला मुद्दे नसतात. मागच्या निवडणुकीच्या वेळी दिलेल्या महत्वाच्या आश्वसनाफैकी कोणतेही आश्वासने पुर्ण झाल्याने विकास कामावर बोलणे म्हणजे स्वतः च स्वतः चा हसु करून घेणे होय. म्हणून निवडणूक समोर आल्यावर ज्वलंत विषय पाहिजे म्हणून ते विषय तयार केले जातात. आणि या विषयांना तापवण्यासाठी मानसिक मागासलेल्या लोकांचा वापर केला जातो. भारत जातीप्रधान देश असल्याने येथे एक जात प्रत्येक जातीला सामाजिक पातळीवर मागास समजून माणसा माणसात भेद करून माणसाला माणसा जवळ येऊ दिले जात नाही. अर्थात च सर्व माणसे सारखे आहेत व प्रत्येकाने प्रत्येकासोबत माणुसकी ने वागायला पाहिजे अशी शिकवण सुद्धां आहे. म्हणजे जातीच्या आधारावर मागास पण ठरत नाही तरीही हजारो वर्षापासून येथे जातींना मागास ठेऊन त्यांचे हक्क अधिकार शिक्षण नोकरी सर्व काही बंद करून अज्ञानात ढकलले गेले. मागास पणाचे अनेक प्रकार आहेत. जसे आर्थिक मागास, बौद्धिक, मानसिक किंवा वैचारिक मागास, आणि स्वतः ची झोळी भरण्यासाठी जातींना ही मागास ठरले. कोणतीही जात मागास नाही परंतु प्रत्येक जातीत आर्थिक व बौद्धिक, वैचारिक मागास लोक आहेत. सर्वात घातक कोणते मागासलेले पण असेल तर ते आहे मानसिक अर्थात बौद्धिक व वैचारिक, आणि हेच मानसिक मागासलेलेपण समाजामध्ये तेढ निर्माण करतात. मानसिक व बौद्धिक मागास लोक केवळ ऐकीव व काल्पनिक गोष्टी वर विश्वास ठेवून स्वतः चे मत बनवतात. आणि आज सोशल मिडिया च्या माध्यमातून ते शेअर केले जाते. व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वर विश्वास ठेवून स्वतःला तज्ञ व वैचारिक समजणाऱ्यांची संख्या कमी नाही. सध्या महाराष्ट्रात आरक्षणा संदर्भात आंदोलन सुरू आहे. मुळात मराठा समाजाला एकत्र करून कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याचे ते आंदोलन आहे. कारण महाराष्ट्रात अनेक मराठा कुटुंबाकडे कुणबी प्रमाणपत्र आहे. ज्यांच्या कडे नाही त्यांना देण्यात यावे यासाठी त्यांचे आंदोलन संविधानीक मार्गाने शांततेत सुरू आहे. परंतु प्रसार माध्यमांनी विषयाची चुकिची मांडणी करून केवळ प्रमाणपत्र मिळावे म्हणून आंदोलनाला मराठा आरक्षण आंदोलन नाव दिले. जसेही मराठा आरक्षण शब्द मिडिया ने समोर केला तसेच व्हाट्सएप युनिव्हर्सिटी चे काही गुणवंत विद्यार्थी, तरुण तरुणी आणि सुपाऱ्या घेऊन लोकांमध्ये अज्ञान पसरवणारे व शिक्षण व नोकरी वर कधीच न बोलणारे एकदम विचारवंत झाले. आणि आपले वैचारिक मागासले पण दाखवायला सुरुवात केली. मराठ्यांना आरक्षण मिळालेच पाहिजे, कुणबी प्रमामपत्र मिळालेच पाहिजे हा आंदोलनाचा भाग आहे. आणि आंदोलन करण्याचा अधिकार संविधानाने बहाल केला आहे. परंतु मराठ्यांना आरक्षण द्या हि बाजु मांडताना व्हाट्सएप युनिव्हर्सिटी चे विद्यार्थी काय काय मत मांडून स्वतः चे वैचारिक मागासले पण दाखवतात हेही बघणे गरजेचे आहे. दोन रूपये तिन रूपये किलोचे उदाहरण देऊन गरिबीची थट्टा करतात. जे की गरिब प्रत्येक जाती धर्मामध्ये आहेत. गरीबीची थट्टा करण्यांना गुणवंत व अभ्यासु समजणे कितपत योग्य आहे? हा प्रश्नच आहे. दुसरी गोष्ट काल्पनिक गोष्टी सांगुन ४०% व ९०% चा काल्पनिक सिद्धांत मांडून आरक्षणामुळे कमी गुण असलेले लोक नोकरी करत आहेत असं सांगतात तेव्हा त्यांना याची जाणीव नसते की कुणबी मराठा समाजाचे अनेक तरुण ओबिसी मधुन आरक्षण घेऊन नोकरी करत आहेत. त्यांच्या मध्येही गुणवत्ता नाही? स्वतःला गुणवान विद्यार्थी समजून आरक्षणाच्या माध्यमातून केवळ बौद्धांना लक्ष करणाऱ्या कडे किती बुद्धीमत्ता, गुणवत्ता अआहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. स्वतःला बुद्धीमान व गुणवंत समजणाऱ्यांना आरक्षण कशामुळे दिले गेले हे जर समजत नसेल तर त्यांच्या कडे किती गुणवत्ता आहे समजून येते. आरक्षण नसल्यामुळे ९०% वाला घरी व ४०% वाला सिद्धांत मांडणाऱ्या व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या विद्यार्थ्यांना आरक्षण केवळ५ ५०% आहे आणि त्यामध्ये ५३० जाती महाराष्ट्रात आहेत. याची जाणीव नसेल आणि उरलेल्या ५०% जागेवर कोणाचे अतिक्रमण आहे हे कळत नसेल तर ते नेमके बुद्धीमान व गुणवंत विद्यार्थी कोणत्या विद्यापिठाचे आहेत? काही तरुणी तर ससा आणि कासवाची गोष्ट सांगुन आपली बुद्धीमत्ता व गुणवत्ता दाखवण्याचा निरागस प्रयत्न करताना दिसत आहेत. सशाच्या शर्यतीत कासव जिंकत आहे म्हणतात. तर नेमके कासव कोण आहेत कुणबी, तेली, साळी, कोळी, माळी, कुंभार, धनगर, हे तर नाहीत ना? स्वतःला चपळ ससा समजणाऱ्यांनी खुल्या प्रवर्गाच्या ५०% गाजेवर बोलणे आवश्यक नाही का? पण व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या विद्यार्थ्यांना फक्त जेवढे व्हाट्सएपच्या माध्यमातून पाठवले जाते तेच सत्य दिसते. त्यांना ५०% जागा अराखीव असतात ह्याची जाणीवच नाही तरीही ते स्वतःला बुद्धीमान समजतात. आणि हेच बुद्धीमान लोक दोन रूपये,तिनरूपये, ४०% ९०%, कासव ससा सिद्धांत मांडून समाजात तेढ निर्माण करतात. आणि आज आय सेल फक्त चुकिच्या, संभ्रम, गैरसमज व अज्ञान कायम राहील अशाच पोस्ट जास्त शेअर करतात. परंतु अभ्यासपूर्ण, माणसे जोडणाऱ्या, संविधानीक पोस्ट जास्त शेअर होत नाही. कारण मानसिक मागासलेल्या लोकांना हाताशी धरून सामाजिक तेढ निर्माण केली जात आहे. मराठा आरक्षणाच्या आडून आरक्षणाला व बौद्धांना द्वेष करून स्वतः ची बुद्धीमत्ता व गुणवत्ता दाखवणारे लोक जर १०% आर्थिक दुर्बल घटकांसाठी देण्यात आलेले असतानाही त्या आरक्षणाचा फायदा कोण घेत आहे? यावर का बोलत नसतील. आर्थिक दुर्बल घटकासाठी १०% आरक्षण असताना त्यामध्ये गरिब मराठ्यांना आरक्षण मिळत नाही का? आणि नसेल मिळत तर का मिळत नाही? मग ते १०% आरक्षण कोणासाठी याबद्दल कोणताही बुद्धीमान विद्यार्थी बोलताना दिसत नाही. म्हणजे व्हाट्सएप युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून गुणवंत व बुद्धीमान विद्यार्थी केवळ व्हाट्सएप वर आलेल्या मँसेज नुसारच वागतात. स्वतः च्या मेंदुचा कधीच वापर करत नाहीत. दुसरी गोष्ट प्रत्येक वेळी आरक्षण हे गरीबीशी जोडून जे काही अज्ञान दाखवतात त्यावरून त्यांनी कोणता अभ्यास केला असेल हे लक्षात येते. गोरगरीब हुशार तरुणांना बाजूला सारून लाखों रुपये भरून पैशाच्या वशिल्याच्या जोरावर अनेकांनी नोकऱ्या मिळवल्या हे बुद्धीमान विद्यार्थ्यांच्या लक्षात कसे येत नाही? लाखों रूपये भरल्यामुळे गरिब मराठा तरूणांना नौकरी पासून दुर रहावे लागले यावर पैसे घेऊन अज्ञान पसरवणारे आणि व्हाट्सएप युनिव्हर्सिटी चे लोक का बोलत नसतील? वारकरी संप्रदाय हा मानसाला जोडून बंधुभाव व समता प्रस्थापित करतो. परंतु वारकऱ्यांच्या वेशात सामाजिक तेढ निर्माण करनाऱ्यांची दुकानदारी केवळ अज्ञानावर सुरू आहे असेच दिसुन येते. मराठा समाज आंदोलनाच्या माध्यमातून कुणबी प्रमाणपत्र माघत आहे. त्याला आरक्षणाचे स्वरूप देऊन ओबिसी मधील काही लोकांना भटकवले जात आहे. ओबीसी म्हणतो आणि आमचे आरक्षण देणार नाही. मुळात कुणबी ओबिसी मध्ये आहे, आणि कुणबी प्रमाणपत्र दिले तर ते वेगळे असे काहीच माघत नाहीत उलट आहे त्याचत ते समाधानी आहेत. तरीही ओबीसी चे आक्रमक होऊन मराठ्यांना विरोध करत आहेत. दहा टक्के आर्थिक निकषावर आरक्षण देतांना ना कोणतेही आंदोलन झाले, ना कोणती समिती नेमली तरीही आरक्षण दिले गेले. आणि स्वतः ला विद्वान समजणाऱ्यांनी त्यावर एकही शब्द न बोलता मराठा ओबीसी वाद सुरू असताना आणि १०% मध्ये मराठ्यांना फायदा मिळत नसताना ते १०% आरक्षण बंद करून ओबिसीच्या वाट्याला द्यावे म्हणजे आरक्षणाचा मुद्दाच राहणार नाही. एवढे सोपे असताना ही आरक्षणाचा मुद्दा केवळ आणि केवळ तानुन धरून चुकिच्या पद्धतीने मांडणी करून, चुकिच्या लोकांचे व्हिडीओ शेअर करून समाजामध्ये शैक्षणिक किती अज्ञान आहे हेच दाखवले जात आहे. आरक्षणाच्या माध्यमातून ही व्यवस्था आजही लोक मानसिक दृष्टीने किती मागास आहेत हेच तपासत आहेत. त्यामध्ये व्हाट्सएप युनिव्हर्सिटी चे विद्यार्थी बरोबर उत्तीर्ण होऊन स्वतःला विद्वान व गुणवंत समजणारे किती अज्ञानी आहेत याची प्रचिती येते. आरक्षण हे केवळ प्रतिधीत्व देते गरीब हटाव चा कार्यक्रम म्हणून त्याचा वापर करून नये. कोणतीही जात मागास नसुन माणसे सारखेच आहेत. परंतु येथे जाती निर्माण करून जातीला सामाजिक मागास समजलेले आणि त्याच मागास समजल्या लोकांना प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची निर्मिती झाली आहे. हे विसरून चालणार नाही. केवळ सोशल मिडीयावर वादग्रस्त व अज्ञानी व्हिडीओ शेअर करून सामाजिक तेढ निर्माण करण्याअगोदर स्वतःच्या बुद्धीचा थोडातरी वापर करून सत्य परिस्थिती समजून घेतली तरच शिक्षणाचा व बुद्धीचा फायदा होईल. फक्त रिल्स बनवून कोणी बुद्धीमान होत नसते. हे तरुणांनी लक्षात घ्यावे. आणि आपल्या माणसिक मागास पणामुळे सामाजिक तेढ निर्माण होऊन त्याचे परिणाम इतरांना भोगावे लागतात. हे विसरू नये.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# सध्याची नाती सूर्यफुलासारखी

आधुनिक केसरी

**नांत कोणतही असु ते शाश्वत असलं पाहिजे पण असं वास्तवता होत नाही. स्वार्थ हा नात्यांचा आधार कधीच नसतो.पण स्वार्थ बळावत असल्याने बहुतांश नाती ही स्वार्थ भोवती फिरत आहेत. नात्यांचं महत्व हे पशु पक्षांना आहे आपण तर जिती जागती माणसं आहोत.आपल्या लेखी नात्यांचं महत्व किती मोठं ,असलं पाहिजे.पण क्षणिक लाभ, स्वार्थ,मोह,माय,भौतिक संसाधन,अंहकार,राग, द्वेष,अज्ञान,आणि इतर काही, प्रत्यक्ष अ प्रत्यक्ष घडामोडी यामुळे सध्या विद्यमान युगात नात्यांचं महत्व कमी होऊन नाती हि स्वार्था भोवती फिरू लागली आहेत हेच या युगातील दुर्दैव आहे.खरंया अर्थाने जिथं स्वार्थाचा लवलेशही नसतो आणि असत ते फक्त निरगस प्रेम आपुलकी जिव्हाळा,आपलेपणा जीवाला जीव देण्याची भावना,ते खरं नातं असत.**

पण अशी खरी आणि शाश्वत नाती हि हल्ली अपवादानेच आढळतात. सृष्टीच्या रचनेतील मानव हा सगळ्यात बुद्धिमान प्राणी असुन जीवनातील प्रत्येक नात्यांच एक वेगळं व अनन्य साधारण असं महत्व असत . नाती हि दोन प्रकारची असतात. एक नातं जे आपल्या जन्माने मिळालेले असतं ते म्हणजे आप्तस्वकीय आणि दुसरी म्हणजे आपण अर्जित केलेली नाती.जीवनातील बहुतांश नाती हि जन्माने प्राप्त होतात तर काही नाती कळत नकळत योगायोगाने आपला व्यवहार,परिचय, संपर्क, आणि जीवनातील काही घडामोडी यामुळे निर्माण होतात .नात असण किंवा निर्माण होण या मध्ये काही वावगं नाही.पण नातं आयुष्य भर टिकलं पाहिजे हे महत्वाचे आहे.पण असं खरंच होतं का तर नक्कीच नाही.कारण नाती हि आजकाल सुर्य फुलासारखी झाली आहेत .जिकडे लाभ तिकडे नमन अशीच कहिशी अवस्था सगळीकडे प्रकर्षाने जाणवते आहे.नातं मग ते जगातील कोणताही असो ते लाभासाठी स्वार्था साठी नसतंच मुळी नात्याचा मुख्य आधारस्तंभ हा निस्वार्थ असतो .पण हल्ली मानव इतका सुसाट सुटला आहे कि नात्यांचा अर्थ स्वार्थाने घेरलाय भौतिक संपदा धन जे क्षणभंगुर आहे ते अर्जित करण्यासाठी जी काही स्पर्धा लागलेली आहे.ती स्पर्धा भायनक व आश्चर्यकारक आहे.आणि या सगळ्या मध्ये महत्वाची बाब म्हणजे नात्यांचा थेट बळी जात आहे.हे सध्याच भयानक वास्तव आहे.नातं काय असतं कशासाठी असतं त्याचा गुह्य अर्थ लुप्त झाल्यामुळे नाती गोती व त्याच महत्व सर्वार्थाने त्याची जागा घेतली आहे. आणि नात्यांनची मुळ संकल्पना काय हे हल्ली स्वार्थी वृत्ती मुळ आपल्याला विसर पडला आहे. आपण प्रकृतीच्या रचनेतील महत्वाची वनस्पती असणारे सुर्यफुल पाहिलं असेल ते जिकडे सुर्य प्रकाश तिकडे फिरते म्हणजे थोडक्यात संधीसाधू



असतं म्हणजे जिकडे प्रकाश तिकडे त्याची दिशा तशीच अवस्था आजकाल आपली झाली आहे. सुर्य फुल हे अतिशय सुंदर फुल पण या फुलाच एक गुण वैशिष्ट्य आहे. ते गुण वैशिष्ट्य म्हणजे दररोज सकाळी सुर्य उगवताना हे सुर्य फुल सुर्यकाडे आपली दिशा करते.आणि संध्याकाळी सुर्य अस्ताला जाताना पुन्हा आपली दिशा बदलून सुर्य काडे आपली दिशा करते . एकंदरीत काय तर जिकडे सुर्य प्रकाश तिकडे सुर्यफुल आपली दिशा बदलते.आणि याच पद्धतीने आज काल माणसं स्वार्थापोटी क्षणिक लाभाच्या लालसेपोटी तत्व एकनिष्ठता ,निष्ठा या सगळ्या गोष्टींना तिलांजली देऊन जिकडे लाभ तिकडे फिरकता हे वरकरणी जरी चालू असल तरी अंतरीक समाधान देणारं नक्कीच नाही. तत्व, एकनिष्ठता ,शब्द प्रमाण असणारी माणसं याच मातीत जन्माला आली होती. वेळ प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती दिली पण निष्ठा बदलली नाही.याची परिणती इतिहासाने नोंद घेतली .आणि आज याच मातीत जन्माला आलेली बहुतांश माणसं जिकड लाभ तिकडे मार्गक्रमण करतात .मग या सगळ्या मध्ये तत्व निष्ठा हे सगळं चर्चा करण्या पर्यंत उरत. मग खरंय अर्थाने प्रश्न समोर येतो तो हा कि आपण मानव आहेत आपली एक संस्कृती आहे .त्याचे काही तत्व आहेत. पिढ्या न पिढ्या हि तत्व एकनिष्ठता पाळत होती .तेव्हा नात्यांचं महत्व जास्त होत आणि लाभाला स्वार्थाला शुन्य महत्व होतं .पुन्हा एकदा लाभ महत्वकांक्षा,स्वार्थ,मोह,माया, संपदा,यापालिकडे जाऊन निस्वार्थी भावनेने नाती जापणयाची आवश्यकता आहे.यासाठी आपले संस्कार मजबूत आणि भक्कम असले पाहिजे आणि हे भक्कम असतील तर मग आपण जगातील कोणत्याही प्रकारच नांत जपताना त्या मध्ये स्वार्थ लालसा महत्वकांक्षा यांचा अंतर्भाव असणार नाही. शुद्ध ज्ञान हाच ज्ञानाचा आधारस्तंभ असेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



कन्नडमध्ये २ डिसेंबर रोजी गिरणी ग्राउंड येथे आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांची जाहीर सभा होणार असुन तालुक्यातील मराठा बांधव कामाला लागले असुन प्रत्येक गाव वाडी वस्त्यावर जनजागृती सुरू झाली आहे. या विराट सभेला लाखोची गर्दी असणार आहे. याच नियोजन अंतिम टप्प्यात आले आहे. याची तयारी म्हणून पूर्वनियोजित सभेसाठी भव्य स्टेज व व्यासपीठ उभारणी करण्यासाठी नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला.

# हरीश धंजे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**पहुर :** २६नोव्हेंबर संविधान दिनानिमित्त एस ५ फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत मेहतर वाल्मिकी समाजातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या काही लोकांना एस फाईव्ह फाउंडेशन तर्फे सन्मानित करण्यात आले . पहूर येथील हरीश धंजे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. चरणजित सिंह अटवाल माजी लोकसभा उपाध्यक्ष हे होते. कार्यक्रमात प्रमुख अतिथी माननीय श्री चरणजीत सिंह अटवाल माजी लोकसभा उपाध्यक्ष यांच्या हस्ते हरीश धंजे यांना डॉ. बी. आर. आंबेडकर राष्ट्रीय समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले या यावेळी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुरेश राम चव्हाण, राष्ट्रीय महासचिव राजा वाल्मिकी, राष्ट्रीय कोषाध्यक्ष हरीश रेवाडीकर., डॉ. राधा वाल्मिकी उत्तराखंड, रवींद्र कुमार आरबीआय जनरल मॅनेजर मुंबई हे उपस्थित होते.



# संभाजी ब्रिगेडकडून क्रांतिज्योतीच्या नायगावात क्रांतिसूर्यास अभिवादन




आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतिदिनी त्यांना संभाजी ब्रिगेडकडून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगावांत जाऊन अभिवादन करण्यात आले.या वेळी संभाजी ब्रिगेड जिल्हा अध्यक्ष रफीक शेख, संतोष मालुसरे, तेजस्विनी केसरकर, शौकत शेख, मेहबूब पठाण, सुजित दगडे, वसीम शेख,वनिता भोसले पाटील, सुजाता शिवशिखरे, दीपक बाटे, प्रथमेश जाधव, संतोष भासले सचिन जाधव, सुहास नेवसे, रुपाली नेवसे, विशाल नेवसे, मनोज नेवसे, श्रेयश नेवसे, नागेश नेवसे, मारुती नेवसे आदी उपस्थित होते. संभाजी ब्रिगेडच्या वतीने नायगाव ता.खंडाळा येथे असलेले क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले स्मारका भेट देऊन क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष रफीक शेख म्हणाले की, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी संभाजी ब्रिगेड, महिला आघाडी, वाहतूक आघाडी सर्व पदाधिकारी आले. गावच्या ग्रामस्थांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल इतिहास सांगितला. त्यांचे व्यवस्थितपणे दाखवित माहिती दिली. हे सगळं बघत असताना आजचा दिवस हा आठवणीत राहील. या गावात काही अडीअडचणी असल्यास आम्हाला संपर्क साधावा. रस्त्याची समस्या असेल की सुशोभिकरणाची अडचणी असतील त्या आमचे तालुका अध्यक्ष संतोष मालुसरे यांच्याशी संपर्क साधून आम्हाला सांगावे. यावेळी नायगाव मधील मारूती नेवसे म्हणाले की, या ठिकाणी पर्यटक येत असतात. परदेशातील लोक सुद्धा भेट देत असतात. ग्रामस्थाकडून आदराने स्वागत करत माहिती दिली जात असते.

अशा प्रकारे सावित्रीबाई फुले यांचे कार्य असेच पुढे जावे. त्यांचा इतिहास लहान मुलां पर्यंत पोहचावा. ही आमच्या नायगावकरांची अपेक्षा आहे. म्हणून आम्ही हिरीरीने भाग घेत स्वागत करताना त्यांना जी जी माहिती पाहिजे ती आम्ही सांगत असतो.

संभाजी ब्रिगेड च्या वतीने क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले स्मारक नायगाव या ठिकाणी जाऊन क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुण्यतीथी निमित्ताने पुष्पहार अर्पण करण्यात आले.

महात्मा फुले यांनी 1869 साली रायगडावर जाऊन शिवरायांच्या समाधी चा शोध घेतला पुण्यात येऊन शिवजयंती उत्सवाला सुरवात केली त्यांनी 908 ओळीचा शिवरायांच्या जीवनावरील आधुनिक काळातील पहिला महत्व पूर्ण पोवाडा लिहिला जिजामाता याच शिवाजी राजांच्या गुरू आहे, अशी मांडणी महात्मा फुले करतात शिवचरित्राचा वापर विधायक कार्यासाठी महात्मा फुले यांनी केला थोर समाज सुधारक भाई माधवराव बागल म्हणतात "शिवस्मारकाची कल्पना प्रथम महात्मा फुले यांचीच होती".

आधुनिक काळात वास्थव शिवचरित्र घरोघरी पोहचविणारे महात्मा फुले हे खरे शिवशाहीर आहेत. शिवचरित्राची अस्सल साधन हाताशी नसताना वास्थव इतिहासाकडे कसे पोहचावे , ही फुलेंची अन्वेषण पद्धती सांगते महात्मा फुले हे संशोधकांचे दीपस्तंभ आहेत भूमीपुत्रांच्या हक्कासाठी दिवसा रस्त्यावरची लढाई तर रात्री त्यांचा इतिहास शोधण्यासाठी पुस्तकांशी लढायचे, असे महात्मा फुलेचें कार्य होते.

# प्राचार्य इंगळे यांना समाजभूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** येथील से.नि.प्राचार्य के.पि. इंगळे सर यांना "डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय समाजभूषण" पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचारमंच महाराष्ट्र रत्नागिरी, भारत ( रजि. ) यांच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, साहित्यकला क्षेत्रात केलेल्या प्रदीर्घ कार्याबद्दल दिला जाणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय समाजभूषण हा सन्मानाचा पुरस्कार मंठा येथील आविष्कार साहित्य मंडळाचे सचिव प्राचार्य के.पि. इंगळे यांना गडचिरोली चंद्रपूर येथे दि. १४ नोव्हें. २०२३ रोजी संपन्न झालेल्या संस्थेच्या तिसऱ्या वर्धापनदिनाच्या सोहळ्यात प्रदान करण्यात आला आहे. मंठा शहरात गेल्या तीस वर्षापासून सुरु असलेल्या सामाजिक व साहित्यिक चळवळीस त्यांचे योगदान महत्वाचे आहे.

हा सन्मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे नातलगांनी व मित्र परिवारांनी अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल आविष्कार साहित्य मंडळाचे अध्यक्ष डॉ.धोंडोपंत मानवतकर, सेलूचे बालसाहित्यिक श्री पु.ना. बारडकर व श्री संग्राम तोगरे सर यांनी त्यांचा शॉल व पुष्पहार घालून सत्कार केला.



महाराष्ट्र Business Katta












# अवयदानाबाबत जागृती



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**अवयवदानाबाबत लोकांमध्ये जागृती वाढत आहे.अंग दानाबाबत केंद्र राज्य सरकार व अन्य.सेवाभावी संस्थांच्या जन जागृती कार्यक्रमामुळे ज्यांचे ब्रेन मृत झाले आहे असे परिवार पुढं येवून अंग दान करत आहे. शहरी भागा प्रमाणेच ग्रामीण भागात देखील ही जागृती समाजभान राखण्याची गती वाढत आहे.२०१३ पर्यंत आपल्या देशात अवयवदानाची सुमारे पाच हजार प्रकरणे समोर आली होती. मात्र आता त्याची संख्या १५ हजारांच्या पुढे गेली आहे. नागपुर तालुक्यातील कोंढाळी येथील दशरथ महेश त्या अवय दात्याचे नाव. दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना देखील समाज भाग राखत ब्रेड पतीचे अवयदान करण्याचा निर्णय पत्नीने घेतला ग्रामीण भागातील भाजी विक्रेत्याच्याय पत्नीने घेतलेल्या या मानवतावादी निर्णयाने तिघांना नवे आयुष्य मिळाले आहे.**

दशरथ महेश चकवेल हे व्यवसायाने भाजीविक्रेते होते २१ नोव्हेंबर रोजी अचानक त्यांची प्रकृती खालवल्याने त्यांना अखिल भारतीय आर विज्ञान संस्थेत दाखल करण्यात आले त्यांच्या मेंदूमध्ये तीव्र स्वरूपातील रक्तस्त्राव झाल्याने निदान झाले. डॉक्टरांनी शर्तीचे प्रयत्न केले मात्र उपचारात प्रतिसाद मिळत नसल्याचे लक्षात येतात चेक बिल यांची तपासणी करून मेंदू.मृत घोषित केले. अशा परिस्थितीत डॉक्टरांच्या चमूने चकबेल परिवाराला अवय दानासाठी समुपदेशन केले. दुःखातही या कुटुंबीयांनी अवयंदान करून इतरांना जीवनदान दिले. अवयवदानाबाबत शासन धोरण राबवत आहे. अवयं दाना बाबत अधिक सुलभता आणण्याची गरज आहे. अवधान करणाऱ्यांचा शासन स्तरावरून सत्कार देखील व्हायला पाहिजे. काही राज्यांनी अवयवदान करण्याचा सत्कार करण्याचा निर्णय घेतलेला आहे. राज्यांच्या अधिवासाची अटही काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. म्हणजे एखादा रुग्ण देशातील कोणत्याही राज्यात जाऊन अवयव मिळविण्यासाठी नोंदणी करू शकतो. अवयवदानासाठी ६५ वर्षांखालील वयोमर्यादा रद्द करण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे.

अवयनाबाबत जगाच्या तुलनेत भारत बराच मागे आहे.भारतात १० लाख लोकांमध्ये.०.१६ लोक अवय दान करतात. तर स्पेन मध्ये दहा लाख लोकांमागे ३६ जण देहदान करतात क्रोएशियात हा आकडा ३५ आणि अमेरिकेत २७ इतका अधिक आहे २०१८ मध्ये महाराष्ट्रात १३२ तामिळनाडू १३७ तेलंगणामध्ये १६७ आणि आंध्र प्रदेशात ४५ आणि चंदिगडमध्ये केवळ ३५अवयदांन झाले होतेM तामिळनाडू ने मागील काही काळात या क्षेत्रात आश्वासक कामगिरी केली आहे.

**अवयवदान म्हणजे काय?**

एखाद्या व्यक्तीच्या शरीराचा कोणताही अवयव दान करणे याला अवयवदान म्हणतात. हा अवयव दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात प्रत्यारोपित केला जातो. यासाठी दान केलेला अवयव ऑपरेशनद्वारे दात्याच्या शरीरातून काढला जातो.

**कोणते अवयव दान करता येतात?**

शरीराच्या अवयवांव्यतिरिक्त, ऊतक देखील दान केले जाऊ शकतात. दान केलेल्या शरीरातील अवयवांमध्ये यकृत, मूत्रपिंड, स्वादुपिंड, हृदय, फुफ्फुसे आणि आतडे यांचा समावेश होतो. त्याच वेळी, शरीराच्या ऊतींमध्ये, कॉर्निया (डोळ्याचा भाग), हाडे, त्वचा, हृदयाच्या झडपा, रक्तवाहिन्या, शिरा, कंडरा आणि इतर काही ऊतक देखील दान केले जाऊ शकतात. अवयवदान कसे होते?भाग दोन प्रकारात बनवले जातात. पहिले - जिवंत अवयव दान आणि दुसरे - मृत अवयव दान. जिवंत अवयव दानानुसार, ज्या लोकांना त्यांचे अवयव दान करायचे आहेत ते मृत्यूपत्र तयार करतात ज्यामध्ये त्यांच्या मृत्यूनंतर लगेच त्यांच्या शरीराचा कोणता भाग दान करावा हे लिहिलेले असते.यामध्ये एखादी व्यक्ती जिवंत असताना आपल्या शरीराचे काही भाग दान करते. मृत्यूनुसार अवयवदान, मृत्यूनंतर अवयवदान. यामध्ये डोळे, मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुस, हृदय, स्वादुपिंड आणि आतडे दान करता येतात. अवयव दानासाठी वयोमर्यादा देखील आहे, त्यानुसार १८वर्षे वयाची कोणतीही व्यक्ती जो निरोगी आहे तो अवयव दान करू शकतो. मानवी शरीर दान केल्यावर त्यातील अनेक अवयव गरजूंच्या शरीरात प्रत्यारोपीत केले जाऊ शकतात तर वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि संशोधनासाठी हा प्रकार मानवी देह समजून घेण्यास आणि संशोधन करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो वैद्यकीय संशोधनासाठी मानवी देह अत्यंत



आवश्यक असतो मुलगा मी वैद्यकीय संशोधनात मोठी भराडी घेण्यासाठी वैज्ञानिकांनी मानवी देहांवरील विविध आजारांमुळे झालेले परिणाम जाणून घेणे गरजेचे असते.

# मीनल येवले यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**मातीवर नितांत प्रेम करणाऱ्या,मातीशी जीवाभावाचे नाते जपणाऱ्या व स्वतःला मातीची लेक मानणाऱ्या प्रसिद्ध कवयित्री प्रा. सौ.मीनल सुरेश येवले यांचा जन्म १४सप्टेंबर१९६५ रोजी अमरावती जिल्ह्यातील सुर्जी अंजनगाव येथे झाला. ग्रामविकास कनिष्ठ महा. कुही ,नागपूर येथे कनिष्ठ व्याख्याता म्हणून कार्य करणाऱ्या मीनल येवले यांचे 'मोहोर ', 'परीघ', 'मी मातीचे फूल', 'वेदनेला फुटे पान्हा', 'विखुरलेले स्वप्नचांदणे',हे काव्यसंग्रह व 'आंदण',' एकांताचे कंगोरे' ,'रुजवाई' हे ललित लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत.'आस्वाद'हा त्यांचा काव्यरसग्रहण संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे.**

अनेक नामांकित साहित्य संस्थाचे २३ पुरस्कार



त्यांना प्राप्त झालेले आहेत. आकाशवाणी नागपूर केंद्रावरून अनेकदा त्यांच्या कविता व लेखांचे प्रसारण झाले आहे. 'आंदण' ललित लेखसंग्रहातील 'वसंतवेणा' हा लेख अमरावती विद्यापीठातील मृदगंध भाग -१ या बी.ए. प्रथम वर्षाच्या पाठ्यपुस्तकात २०१७ ते २०२२ पर्यंत समाविष्ट करण्यात आला होता.

'मी मातीचे फूल' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत दोन शब्द आशिषाचे लिहिताना डॉ. मधुकर वाकोडे यांनी मीनलताईंच्या कवितेविषयी काढलेल्या गौरवद्गारावरून त्यांच्या कवितेच्या प्रगल्भतेची कल्पना येते.ते लिहितात, "अस्तित्वाचे चंद्रलेणे भाळी गोंदवून आलेली ही कवयित्री मराठी कवितेत आपले रक्तचंदनी नाते रेखाटताना जाणवते. उद्याच्या मराठी कवितेत तिचा नवसृजनाचा हा जोगवा भरभरून गोडवा निर्माण करणार आहे यात शंका नाही." ग्रामजीवनाशी जिव्हाळ्याचे नाते जपणाऱ्या मीनल ताईंनी संसार,शेती, गाव,मायेची माणसं, शेतकरी अशा विविध विषयांवर काव्य लेखन केले आहे. त्यांच्या अनेक कवितांमधून माहेरचे अत्यंत हृदयस्पर्शी असे वर्णन आलेले आहे. स्वतःला मातीची लेक समजणाऱ्या मीनल ताई मातीलाच आपली आई मानतात.मातीलाच अंगाई गातात...त्या लिहितात,

जोजविताना अजूनी गाते
नित्य नवी अंगाई
मी मातीची लेक सावळी
मातीच माझी आई

पुढे मीनल ताई 'मी मातीचे फूल' या कवितेत लिहितात...

**मातीच माझे सासर माहेर**
**मातीच माझी माय**
**मी मातीच्या दुधावरची**
**कृष्ण सावळी साय**

अवघे बालपण मातीच्या सानिध्यात घालवल्यामुळे व काळ्या मातीतून निर्माण होणाऱ्या अन्नधान्यांवरच आपले भरण पोषण झाल्यामुळे मी मातीच्या दुधावरची कृष्ण सावळी साय असल्याचे कवयित्री म्हणतात.मातीच आपले सासर व माहेर असून मातीच आपली माय असल्याचे ही त्यांनी सांगितले आहे. जीवनात अनेक सुखदुःखांना मोठ्या धैर्याने सामोरे जाणाऱ्या कवयित्री आपल्या पित्याचे वर्णन करताना 'माहेर'कवितेत म्हणतात,

आवाक्यानुरूप पंखांच्या बापाने मोकळे उडू दिले
भेदाभेदाच्या पल्याड दृष्टी व्यक्तिमत्त्वाला घडू दिले
उणीवातल्या पायवाटांनी पुरवले चालत राहण्याचे
बाळकडू पचवून सोसता आली दुःख व्यथांची झळ

आवाक्यानुरूप म्हणजेच कवयित्रींमध्ये असणाऱ्या क्षमतानुसार त्यांच्या कलागुणांना त्यांच्या वडिलांनी वाव दिला. मुलगा -मुलगी हा भेद न करता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला घडवण्याची संधी दिली. गावात मुलगी बारावी झाली की,तिचे हात पिवळे करण्याची पालकांना घाई झालेली असायची पण कवयित्रीच्या वडिलांनी जनमताप्रमाणे नं चालता आपल्या मुलीला उच्च शिक्षण देवून स्वतःच्या पायावर उभे केले. उणीवांतूनही त्यांना पुढे चालत राहण्याचे बळ दिले. आई-वडिलांनी दिलेल्या संस्कारातून जीवनातील दुःखांची झळ सोसण्याचे बळ त्यांना मिळाले. बिकट परिस्थितीतही पित्याने दिलेल्या शिक्षणाविषयी कवयित्री पुढे म्हणतात, किती जड

जायचे तेव्हा फीचेही आठ आणे
त्यांनीच तर शिकवले ना आत्मबळाचे जिणे
वाहून नेता येते विश्वासाने संसार वाटेतले ओझे
कर्तव्य जाणिवांची गाठ थोडी जपता नसे तुझे माझे

आजच्या काळात शिक्षणासाठी भरमसाठ पैसा खर्च करावा लागतो. परंतु तिसेक वर्षापूर्वी फीचे आठ आणे भरणेही कठीण जायचे. तरीही पित्याने शिकवले व आत्मबळ निर्माण केले. त्यांनी दिलेल्या या शिक्षणामुळेच आत्मनिर्भर झालेल्या लेकिला संसाराचे ओझे विश्वासाने पेलता येते.आपले कर्तव्य पार पाडताना मनात माझे -तुझे अशी कसलीच अढी राहत नाही असे कवयित्री आत्मविश्वासाने सांगू शकते.

आपल्या भावाचा संसार तडजोडीचा आहे याची जाणीव कवयित्रीला आहे. त्यामुळे माहेरातून कसल्याच प्रकारच्या भरजरी आहेराची त्यांना अपेक्षा नाही परंतु असे असले तरीही आपले जीवन जगताना जे काही दुःखद अनुभव आले त्यातून गारवा मिळण्यासाठी हक्काचे माहेर मात्र त्यांना हवे आहे त्या लिहितात, संसार तुमचा तडजोडीचा नको भर्जरी अहेर जळत तापलं निवण्यासाठी हवंय हक्काचं माहेर पित्याच्या मायेबरोबरच कवयित्रीला लाभलेल्या वत्सल मातेविषयीचे खूप भावस्पर्शी वर्णन आलेले आहे. आपल्या आईविषयी कवयित्री 'सावली' या कवितेत लिहितात,

दिस ऊन पावसाचे संसाराला नित्य झळ
माझी धास्तावून माती तिचे झुकते आभाळ
पुण्य कोणत्या जन्मीचे मज पुरो आले गाठी
तीळ तीळ तुटे जीव तिचा माझ्या सुखासाठी

स्वतः दुःख सोसून आई आपल्या लेकराला सुखी ठेवण्याचा सदैव प्रयत्न करत असते. तसेच कवयित्रीच्या आई सुद्धा संसारातील सुख -दुःख सोसतांना आपल्या लेकीला याची झळ लागू दिली नाही . त्यांचा जीव लेकीच्या सुखासाठी तीळ- तीळ तुटायचा असे वर्णन कवयित्री करतात. कोणत्या जन्मीचे पुण्य माझ्या पदरात पडले की ,अशी प्रेमळ आई मला लाभली असे त्यांना वाटते. आज घराघरात कुटुंबात वाद होताना दिसतात. नात्यातील मायेचा ओलावा आता पूर्वीसारखा राहिलेला नाही. असे असताना कवयित्री मात्र आपल्या आईने शिकवलेल्या जिव्हाळ्याचे मोल आपल्या कवितेतून सांगतात...

**आभावात उणावली**
**आज नात्यातली ओल**



**माऊलीने शिकवले**
**आम्हा जिव्हाळ्याचे मोल**

आपल्या लेकरांसाठी उभे आयुष्य कापरासारखे कष्टात झिजवणाऱ्या आईचे प्रेम आपण विश्वासाने जपतो अशी भावना कवयित्री इथे व्यक्त करतात. बहिण -भावांमधील भांडणात त्यांच्या आई कशी भूमिका घ्यायची? याविषयी त्या लिहितात,

**बंध भावा -बहिणीचे**
**पदरात घेते ऊन**
**माझ्या वाटेवर उभी**
**नित्य सावली होऊन**

भावा बहिणींच्या लटक्या रुसव्या फुगण्यातही आई स्वतःच्या पदरात सारे दुःख घेते व लेकरांच्या वाटेवर मात्र नित्य सावली बनून राहते. जसे आई-वडील आपल्या लेकीच्या सुखाचे चिंतन मनोमनी करतात. लेकीचा संसार सुखाचा व्हावा. तिला सासरी सुख- समृद्धी लाभावी. अशीच त्यांची सदैव इच्छा असते तसेच लेक सुद्धा सासरी असताना तिच्या मनी माहेराचेच विचार येतात. आपल्या माहेरची माणसं सुखी रहावीत,त्यांच्या शेतातलं पीक जोमात यावं, माय- बापाच्या कष्टाला फळ लाभावं अशीच तीची इच्छा असते. शेता शिवारात राबणाऱ्या आपल्या भावाच्या आठवणीने व्याकुळ होत 'माहेरची शीव' या कवितेत कवयित्री लिहितात,

कोसळल्या मृग सरी, त्याचं अंकुरलं रान
काळ्या ढेकळाचं झालं खरं ,हिरवं सपान
शिवारात सुखावती आता त्याचे पंचप्राण
कष्टातच दडलेलं त्याच्या आयुष्याचं गाणं

शेतीसाठी मृगाचा पाऊस अत्यंत आवश्यक असतो . मृग नक्षत्रातच पेरणी केली जाते. चांगला पाऊस झाल्यामुळे आपल्या भावाने पेरणी केलेले रान आता चांगले अंकुरले व काळ्या मातीचे स्वप्न खरे झालेले आहे. शेतात पेरणी करण्यासाठी आपल्या शेतकरी भावाला खूप कष्ट करण्याबरोबरच पैसेही खर्च करावे लागतात त्यामुळे शेता शिवारात जणू काही त्यांचे पंचप्राण गुंतलेले असतात. पीक उगवल्याल्यामुळे भाऊ सुखावल्याचे वर्णन कवयित्री करतात.

शेतातील सोयाबीन , कापूस, जोंधळा असे कोणतेही पीक हाती येईपर्यंत शेतकऱ्याच्या जीवाला धाकच असतो. कधी वेळी -अवेळी येणारा पाऊस तर कधी चोर -चपाट्यांची भीती यामुळे असा जीव टांगणीला लागलेला असतो. कवयित्रीच्या मनाला भावाच्या या टांगणील्या लागलेल्या जीवाची काळजी वाटते व त्या काळजीपोटी लिहितात...

राबराबतो म्हणून होती
**घामाचेच मोती**
**त्याने फिरविली पाठ**
**होते जगण्याची माती**
**त्याला लागे जरी आच**
**माझा उसवतो जीव**
**धन-धान्याने समृद्ध**
**असो माहेराची शीव**

शेतकरी बाप-भाऊ शेतात राबतो ;कष्टतो म्हणूनच घामाचे मोती असणारे अन्न -धान्य सर्वांना खायला मिळते. त्यांनी जर शेतात कष्टच केले नाही तर सर्वांचे जगणे कठीण होईल परंतु ते जेंव्हा संकटात सापडतात तेंव्हा कवयित्रीच्या मनाला त्याच्याविषयी काळजी वाटते. त्यांना थोडी जरी आच लागली म्हणजेच दुःख झाले तरी वेदना लेकीला होतात. उसवतो माझा जीव असे मन हेलावून टाकणारे वर्णन कवयित्री करतात. त्यामुळेच माहेराची शीव सदैव धन-धान्याने समृद्ध राहावी अशी इच्छाही मनोमन व्यक्त करतात. फक्त आपले माहेरघर समृद्ध न राहता अवघा माहेरचा परिसर, गाव सुखी राहावा असा व्यापक दृष्टिकोन त्यांच्या कवितेतून आलेला दिसतो. मीनल येवले यांच्या कवितेविषयी डॉ.प्रा. सुनंदा जुमले लिहितात ,"भावनेच्या शिंपलीत शब्द जोजवत त्यातून कवितेचे शुभ्र मोती वाचकांच्या ओंजळीत ओतणारी प्रतिभा या कवयित्रीला लाभली आहे."

अशाप्रकारे कवयित्री मीनल येवले यांनी आपल्या अनेक कवितांमधून माहेरचे अतिशय हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. माता -पित्यांच्या,भावाच्या कष्टाचे मोल त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. आई-वडिलांनी दिलेले संस्कार जीवनाची शिदोरी समजणाऱ्या, स्वतःला मातीचे फूल समजणाऱ्या व मातीवर जीवापाड प्रेम करणाऱ्या या कवयित्रीच्या पुढील साहित्यिक वाटचालीसाठी माझ्या भरभरून शुभेच्छा!!

# भारतीय संविधान



डॉ. गजपाल इंगोले
मुंबई

आधुनिक केसरी

**आपल्या भारतीय संविधानाने आपल्या प्रत्येक भारतीयाला सामाजिक न्याय, स्वतंत्र. समता इत्यादी हक्क बहाल केले आहेत ,त्यामुळे समता न्याय स्वतंत्र प्रदान करणारे भारतीय संविधान हे एक अनमोल ठेवा आहे.कारण कल्याणकारी राज्याची कल्पना संविधानात आहे,प्रत्येकाचा विकास व्हावा या उद्द्शाने सर्वांना समान मताधिकार आणि सामान संरक्षण आहे,मानवी मूलभूत अधिकाराला प्राथमिकता दिल्याने सर्व सामान्यांना आपला नायक वाटावा असे सर्व काही असल्याने हृदयात जपून ठेवावे असे आपले संविधान आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही गेली कित्येक वर्ष येथे सुखात नांदत आहे तो देश म्हणजे आपला "भारत" देश आहे .**

भरता सोबत मुस्लिम बहुसंख्याकांच्या नवीन पाकिस्तान हे राष्ट्र निर्माण झाले परंतु अवघ्या दहा अकरा वर्षात संसदीय पद्धती ऐवजी राष्ट्रपती पद्धत अमलात आली,कधी लोकप्रतिनिधी तर कधी सेना अधिकारी यांनी सत्ता मिळवली ,खऱ्या अर्थाने पाकिस्तान भरता सोबत स्वतंत्र झाला परंतु तेथे कट्टर धर्म व्यवस्था असल्यामुळे लोकशाही रुजू शकली नाही परंतु त्याच वेळी आपल्या देशात विविध धर्म,पंथ,विविध भाषा,विविध विचारधारा असताना देखील लोकशाही अबाधित आहे, स्वातंत्र्यानंतर भारताची अधिक वेगाने प्रगती सुरू आहे,हे कशामुळे ? तर उत्तर एकच आणि ते म्हणजे आपले "भारतीय संविधान " आणि या देशातील लोकशाहीवादी असणारी भारतीय जनता.

भारतीय संविधानाच्या सरनामा अर्थात प्रास्ताविकात सर्व भारतीयांना सामाजिक आर्थिक,आणि राजनैतिक न्याय तसेच व्यक्तीच्या समान दर्ज्याची समानता देण्याचा निर्धार यातून व्यक्त झालेला दिसतो.भारतीय संविधानाने भारतीय नागरिकाला दिलेले ते एक अभिवचन आहे,आपल्या संविधानाचे प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्याय,समता, व हक्क बहाल करणे हे उद्दिष्ट आहे त्यामुळेच माणसाला न्याय स्वतंत्र प्रतिष्ठा प्रदान करणारे भारतीय संविधान हे एक महान ठेवा आहे भारतीय संविधान या कडे शुद्ध हेतूने पाहता असे लक्ष्यात येते की ही राज्य घटना एक तत्व प्रणाली आहे .जीवन खऱ्या अर्थाने कसे जगावे तो जगण्याचा मार्ग म्हणजे संविधान होय भारतीय संविधान सर्वसमावेशक ,व्यापक व दूरदर्शी आहे या मध्ये प्रत्येक कलमाचा बारकाईने अभ्यास केला असता एवढा मोठा प्रचंड क्षत्रफल असलेला खंड प्राय देशाची प्रशासकीय यंत्रणा नियंत्रित करण्याचे ते एक साधन आहे .प्रेतेक भारतीयाला धार्मिक स्वतंत्र बहाल केल्याने प्रतेक जन आपल्या धर्मातील तत्वे पूजनीय मानतो त्याची पूजा करतो त्याची उपासना करतो,आणि महनून हे संविधान सर्व भारतीयाचा धर्मग्रंथ आहे असे मला वाटते .आणि महणुंन प्रत्येकाला आपल्या धर्मासोबत स्वतंत्र,बंधुता



आणि समता न्याय अधिकाराचा पुरस्कार करणारी आणि मूलभूत अधिकार व कर्तव्य याची जाणीव करून देणारी ही राज्य घटना वंदनीय आहे.

हे सर्वानाच कबूल करावे लागेल डॉ बाबासाहेब आंबेडकर महंतात भारतीय राज्य घटना लवचिक आहे युद्ध आणि शांती या दोन्ही काळात भारतीयांना एकसंघ ठेवण्याचे सामर्थ्य या संविधानात आहे बाबासाहेबांच्या या वक्तव्याचा अनुभव भारतीयांनी अनेक वेळा घेतला आहे.

पिढी दर पिढी विचार बदलतात ,संघर्ष सुरू होतो,लवचिक असणे हे सर्वात मोठे वैशिष्ठे आहे कारण वादळात मुळासकट जमीनदोस्त होणारे मोठे वृक्ष आणि त्याच वेळी वाऱ्यासोबत वेल मात्र लवलावत असते .भारतीय राज्य घटनेबद्दल गौरउद्गार काढताना अमेरिकेतील कर्नोल विद्यापीठातील प्राध्यापक क्लिंटन रोसितर महंतत मी जन्मभर राज्यशास्त्र शिकविले परंतु लोकशाही समाज व्यवस्थेत मागमूस नसताना लोकशाही कोठे नदलेली मी पाहिलेली नाही परंतु भारत हा एकच देश याला अपवाद आहे,विविध विचारधारा विविध धर्म.विविध भाषा यांना एका धाग्यात बांधून लोकशाही टिकविणे हे आश्चर्य आहे," आम्ही भारताचे लोक ,भारताचे एक सार्व भौम ,समाजवादी,धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्तक राष्ट्र म्हणून करतो " असाच ठराव येथे मांडण्यात आला आहे.

संविधानाच्या कलमकडे पाहता राज्य घटनेने बहाल केलेल्या अधिकाराची दक्खल घेणे गरजेचे आहे.1.सर्वांना समान अधिकार - कलम 14,15,16,17 नुसार
2.सर्वांना स्वत्र्याचा अधिकार - कलम 19,20,21,22 नुसार 3.शोषण विरोधी अधिकार - कलम 23,24 नुसार4.धर्म स्वातंत्र्याचा अधिकार - कलम 25,26,27,28 नुसार 5. सांस्कृतिक ,शैशनिक अधिकार कलम 29,30 नुसार 6.घटनात्मक अधिकार हकक अभाधित ठेवण्याचं अधिकार कलम 32,33,34,35 नुसार
भारतीय संविधान याने प्रतेक भारतीय यांना दिलेले हे अधिकार पाहता हे संविधान सर्व भारतीयाचा धर्मग्रंथ आहे असे मला वाटते.

# राजीवभाई आणि योग गुरु रामदेवजी




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**राजीवजी दीक्षित हे एक भारतीय समाज सुधारक होते. त्यांनी स्वदेशी चळवळ बळकट केली, आपल्या अनेक व्याखानांतून त्यांनी स्वदेशी उत्पादनांबद्दल जनमानसांत प्रचार केला व लोकांना स्वदेशी वापराचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. ते भारतीय स्वाभिमान आंदोलनचे संस्थापक म्हणून ओळखले जातात. राजीव भाई दिक्षित एक क्रांतिकारी होते. त्यांनी संपूर्ण भारतीय इतिहासाचा अभ्यास केला. ते स्वदेशी जागरणकर्ता होते. राजीव दीक्षित यांचा जन्म दि. ३० नोव्हेंबर १९६७ रोजी उत्तर प्रदेशातील, अलिगढ जिल्ह्यातील नाहगावात झाला. त्यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण फिरोजाबाद जिल्ह्यात झाले. त्यांनी एमटेकची पदवी आयआयटी कानपूरमधून प्राप्त केली आणि डॉक्टरेट फ्रान्समधून घेतली.**

ते अविवाहित होते. त्यांनी सुरुवातीचे काही दिवस सीएसआयआर आणि फ्रांस टेलिकम्युनिकेशन मध्ये नोकरी सुद्धा केली. एका प्रोजेक्टवर काम करत असताना ते एपीजे.अब्दुल कलाम यांच्या संपर्कात देखील आले होते. स्वदेशी वस्तूंच्या वापरासाठी ते आजीवन झटले, त्यांनी अनेक विदेशी कंपन्यांची पोलखोल केली. तसेच भारताबाहेरील स्वीज बँकेतील भारताचा काळा पैसा भारतात परत अणण्याबाबत आग्रही राहिले. सन २००० ते २००९ या नऊ वर्षात स्वदेशी ओवर विदेशी या हॅशटॅगमुळे ते खूप लोकप्रिय झाले होते. भारत कृषी प्रधान देश असल्याने त्यांनी शेतीला प्राधान्य देऊन ही चळवळ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. त्यांनी रासायनिक खतांच्या ऐवजी स्वदेशी खते म्हणजेच गांडूळ खत, शेण खत ही खते शेतीसाठी वापरण्याचा आग्रह धरला. ते आजीवन स्वदेशी वस्तू वापरण्यासाठी आग्रही राहिले, त्यांनी त्यासाठी भारत स्वाभिमान आंदोलन आणि आजादी बचाओ सारखी आंदोलने उभारली. उच्च पगाराची नोकरी सोडून त्यांनी आपले आयुष्य स्वदेशासाठी व्यतीत केले. स्वदेशीचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी तयार केलेल्या ध्वनिफितींमुळे ते प्रसिद्ध झाले. त्यांनी व्याख्याने ध्वनिमुद्रित करून ती नंतर लोकांना उपलब्ध होतील याची परिपूर्ण काळजी घेतली होती. भारताचा काळा पैसा विदेशी बँकामध्ये अनधिकृतरीत्या कसा फिरतो आहे, हे पण त्यांनी उघड करून दाखवले. भारतीयांनी गैर मार्गाने मिळवून स्विस बँकांमध्ये जमा केलेल्या सर्व काळ्या पैशाची माहिती उघड व्हावी, यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. स्वदेशीचा प्रचार गावोगावी जाऊन केला. जास्तीत जास्त लोकांनी स्वदेशी वस्तू वापरल्या तर देशात रोजगार निर्माण होईल व देशातला पैसा देशातच फिरत राहील हे तत्त्व त्यांनी लोकांसमोर मांडले. ते २० वर्ष व्याख्यान देत देशभर फिरले. राजीवभाई आणि योग गुरू रामदेवजी यांची भेट सन २००९मध्ये झाली. खूप कमी वेळपर्यंत त्यांची ती घनिष्ठ मैत्री टिकली. राजीवभाई आणि योग गुरू रामदेवजी यांचे विचार सारखे होते. आयुर्वेद आणि काळा पैसा याबाबीत त्यांची मते एक होती. नोव्हेंबर २००९मध्ये योग गुरू बाबा रामदेवजी यांनी राजीव दीक्षित यांची भारत स्वाभिमानी ट्रस्टचे प्रमुख वक्ता व राष्ट्रीय सचिव म्हणून नेमणूक केली होती. ही जवळीक बाबा रामदेव यांच्या निकटवर्तीय लोकांना खुपत होती, असे सुद्धा त्या काळात दबक्या आवाजात बोलले जात होते. पुढे ही मैत्री फार काळ टिकू शकली नाही.






भिलाईमध्ये व्याख्यानासाठी दौऱ्यावर असताना दि.३० नोव्हेंबर २०१० रोजी त्यांचे अचानक निधन झाले. त्यांचा मृत्यू हृदयविकाराने झाला, असे प्राथमिकरित्या समजण्यात आले होते, परंतु अजूनही त्यांच्या मृत्यूचे खरे कारण अज्ञात आहे. राजीवभाई यांच्या समर्थकांनी पोस्ट मॉर्टम करून मृत्यूचे नेमके कारण कळावे, अशी मागणी केली होती. पण बाबा रामदेव यांनी ही परवानगी दिली नाही. राजीव दीक्षित यांचे जवळचे मित्र मदन दुबे हे योग गुरू बाबा रामदेवजी यांना भेटले होते. पण त्यांना बाबा रामदेवजी यांना अंतिम संस्कार लवकर व्हावेत यासाठी कमालीची घाई झालेली दिसून आली होती. मदन दुबे यांच्या मते, राजीव दीक्षित यांच्याबद्दल अंतर्गत लोकांची असलेली मतभिन्नता, जळफळाट हेच राजीव दीक्षित यांच्या मृत्यूचे खरे कारण आहे. मदन दुबे यांना असे वाटण्याचे अजून हे एक कारण होते की, ज्या हॉलमध्ये राजीव दीक्षित यांचे पार्थिव ठेवण्यात आले होते; तेथे योग गुरू रामदेवजी आले आणि त्यांनी हे वाक्य वापरले, “पोस्ट मॉर्टम हे हिंदू धर्माच्या विरुद्ध आहे, अंतिम संस्कार लगेच झाले पाहिजे.” ते भगव्या रंगात असतात, पण त्यांचा प्रमुख भर हा योग शिकवण्याकडे असतो. पण त्यावेळी रामदेव बाबांनी अशी धार्मिक बाब सांगितली की, जमलेल्या लोकांनी लगेच त्यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला. प्रदीप दीक्षित व मदन दुबे यांची मागणी त्यामुळे पुर्णपणे दुर्लक्षित झाली. राजीवभाई दीक्षित यांचा मृत्यू नैसर्गिक की घातपात हे कायमसाठी रहाणारे एक गूढ आहे, शवविच्छेदनाला झालेला विरोध, घाईत केलेले अंतिम संस्कार आणि ऐन वेळी प्रदीप दीक्षित यांनी पाळलेले मौन ही यामागची प्रमुख कारणे सांगितली जातात. राजीव दीक्षित यांच्या मृत्यूने त्यांची स्वप्ने अपूर्ण राहिली. राजीव दीक्षित आणि बाबा रामदेवजी हे मिळून सन २०१४मध्ये एक राजकीय पक्ष स्थापन करणार होते, ज्यामध्ये केवळ प्रामाणिक लोक असतील.

“भारत जगात शक्तिशाली देश असेल आणि स्वदेशी आंदोलन देशातल्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचेल.” अशी त्यांची स्वप्ने होती, पण वयाच्या अवघ्या ४२व्या वर्षी त्यांचे निधन झाले आणि ती स्वप्ने अपूर्णच राहिली. त्यांच्या मृत्यूनंतर भारत स्वाभिमानी ट्रस्टचे रूपांतर योग गुरू रामदेवबाबांनी पुढे जाऊन पतंजली केले आणि या पतंजलीमध्ये देशसेवेची ती उर्मी आता राहिली नाही. पतंजली आता एक व्यापारी ब्रँड झाला आहे.

# हतबल बळीराजाला सावरा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**निसर्ग बळीराजाची पाठ सोडायला तयार नाही आधीच दुष्काळाने पिचलेला बळीराजा आता अवकाळी आणि गारपिटीने त्रस्त झाला आहे. यावर्षी आपल्या राज्यात पावसाने हुलकावणी दिली राज्यातील जवळपास ४० तालुके दुष्काळी जाहीर करण्यात आले आणखी शंभरहून अधिक तालुके दुष्काळाच्या प्रतीक्षेत असतानाच जो काय थोडा बहुत पाऊस झाला त्या पावसाच्या पाण्यावर पिकवलेली आणि जिवापेक्षा जास्त जपलेली शेती आता कुठे बहरू लागली होती, महत्प्रयासने राब राब राबून पिकवलेली शेती आता अंतिम टप्प्यात आली होती.**

अनेक ठिकाणी फक्त काढणी आणि मळणी बाकी होती मात्र पुन्हा एकदा निसर्गाचा फेरा आला आणि बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास पुन्हा हिरावून घेतला गेला.


राब राब राबून पिकवलेली शेती एका क्षणात नाहीशी झाली. उभी पिके आडवी झाली. क्षणार्धात होत्याचे नव्हते झाले. डोळ्यासमोर उभी पिके आडवी झाल्याने बळीराजाच्या डोळ्यातील अश्रू थांबायचे नाव घेत नाही. दोन तीन दिवसात आलेल्या अवकाळी पावसाने आणि गारपिटीने राज्यातील खरीप पिके जमीनदोस्त झाली. सर्वाधिक नुकसान मराठवाडा विभागात झाले असले तरी या अवकाळीचा तडाखा राज्यातील जवळपास निम्म्या जिल्ह्यांना बसला आहे. कांदा, भात, तरकारी आणि फळबागांना या अवकाळीचा सर्वाधिक फटका बसला आहे. काही ठिकाणी मेंढ्या आणि शेळ्या देखील दगावल्या असल्याने पशू पालकांचेही मोठे नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसाने राज्यातील बळीराजा खचला आहे. आधीच दुष्काळ आणि त्यात तेरावा महिना अशीच अवस्था राज्यातील बळीराजाची झाली आहे. या अवकाळीने बळीराजा हतबल झाला आहे म्हणूनच या हतबल बळीराजाला सावरण्याचे मोठे काम सरकारला करावे लागणार आहे. झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून आपत्तीग्रस्त बळीराजाला नुकसान भरपाई देण्यात यावी. पंचनामे करताना किंवा नुकसान भरपाई देताना सरकारने अटी आणि शर्तीच्या फेऱ्यात बळीराजाला अडकवू नये. सरकारने त्वरित नुकसान भरपाई देऊन बळीराजाला दिलासा द्यावा अशीच अपेक्षा राज्यातील जनता सरकारकडे व्यक्त करत आहे. हीच वेळ आहे बळीराजाच्या पाठीशी ठामपणे उभे राहायला हवे. केवळ सरकारच नाही तर राज्यातील जनता ही बळीराजाच्या पाठीशी ठामपणे उभी आहे हे दाखवून द्या आणि हतबल बळीराजाला सावरा.



# ...खरंच संविधान आपल्याला कळले का ?

आधुनिक केसरी

**संविधान किंवा राज्यघटना हा एखादा देश अथवा राष्ट्र चालवण्यासाठी आखून दिलेले मूळ आदर्श, पायंडे अथवा नियमांचा संच आहे. हे नियम एकत्रितपणे राष्ट्राचे अस्तित्व ठरवतात. जर हे नियम एक अथवा अनेक पुस्तके अथवा कायदेशीर कलमामध्ये लिहिले गेले असतील तर त्याला लिखित संविधान असे म्हणतात. 2015 ला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 125 जयंती जगभर उत्साहात साजरी केल्या गेली. त्यावेळी संविधान दिवस पहिल्यांदा साजरा केल्या गेला.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

26 नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केल्या जाईल अशी घोषणा केंद्रसरकार कडून केल्या गेली.

संविधानाचे मूल्य लोकांना कळावे त्यासाठी हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केल्या जातो. याच दिवशी अर्थात 26 नोव्हेंबर 1949 रोजी देशाचे संविधान लिहून पूर्ण झाले होते.मात्र 26 जानेवारी 1950 रोजी संविधान देशात लागू करण्यात आले. असो पण खरंच आपल्याला संविधान खऱ्या अर्थाने समजले आहे का ? हा विषय महत्वाचा आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान बनवत असतांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यकारभारा चा आदर्श नजरेसमोर ठेवला होता. तर गौतम बुद्धांचा धम्म देखील त्यांच्या जनरेसमोर होता. त्यामुळेच त्यांनी सर्व धर्मांना समान न्याय दिला.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी राज्यकारभार करत असतांना ज्या पद्धतीने सर्वधर्मसमभाव जोपासला,सर्वांना समान न्याय दिला,सर्व धर्मांना सन्मान दिला तेच नजरेसमोर ठेवून त्यांनी संविधान साकारले.

आज आपल्या देशात संविधानाचे महत्व आणि त्याप्रति आपले कर्तव्य लोकांना खरंच कळले आहे का हा खरं तर चिंतनाचा विषय आहे. अमेरिकेची राज्यघटना असेल, छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यकारभार असेल,अथवा भगवान गौतम बुद्धांचा आदर्श समोर असेल या सगळ्यांचा विचार संविधान निर्मिती करत असतांना केल्या गेला.


राज्यघटना ही लवचिक असल्याने त्यात लोकशाही पद्धतीने दुरुस्ती केल्या जात असते.आणि याच मुळे संविधान धोक्यात आले आहे अशा पद्धतीच्या शंका व्यक्त होतांना व त्यावर चर्चा होतांना दिसत असतात. संविधान सभेत बोलतांना भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की,मी देशाला

लोकशाही देतोय मात्र ती योग्य रीतीने राबविणे हे सत्ताधारी लोकांच्या हातात असणार आहे.

हे पाहू जाता आजचे सत्ताधारी लोकशाही खरंच योग्य पद्धतीने राबवत आहेत का..?

देशातील जनतेला तसा विश्वास वाटतो आहे का ? छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यकारभार नजरेसमोर ठेवून जे संविधान लिहल्या गेले तर त्या पद्धतीचा राज्यकारभार सुरू आहे का ? असे अनेक प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात येणे साहजिक आहे.

याला केवळ राज्यकर्तेच जबाबदार आहेत का ? आपल्याला आपल्या कर्तव्यांची जाणीव झालेली आहे का? व आपण आपल्या कर्तव्यांचे पालन




करतो का ? हा देखील आत्मचिंतनाचा विषय आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा या देशाला संविधान दिले त्यावेळी त्यात माहितीचा अधिकार समाविष्ट नव्हता. नंतर माहितीचा अधिकार आज देशातील जनतेला मिळालेला आहे.अतिशय महत्वपूर्ण अधिकार देशवासियांना मिळालेला असतांना आज या अधिकाराचा उपयोग ऐवजी दुरुपयोग करणारी माणसंच अधिक बघायला मिळतात. त्यामुळे अतिशय महत्वाचा आणि लोकांसाठी मोलाचा असलेल्या या अधिकाराकडे समाजाचा-अधिकाऱ्यांचा बघण्याचा दृष्टीकोन च बदलून गेलेला आहे. संविधान लिहत असतांना किंवा संविधानाच्या मूळप्रतिवर विशेष म्हणजे देवांचे फोटो होते. संविधान हे अल्ला ला किंवा ईश्वराला उद्देशून लिहावे अशी धारणा बाळगणारे अनेक होते मात्र बाबासाहेबांनी संविधान हे लोकांना उद्देशून लिहले हे तितकेच महत्वाचे.

संविधान लिहल्यानंतर तब्बल 7 वर्षाचा कालावधी गेल्यानंतर 1956 ला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारला त्यावेळी आपल्या अनुयायांना त्यांनी 22 प्रतिज्ञा घ्यायला लावल्या त्यात त्यांनी देवत्व नाकारले.

संविधान लिहत असतांना त्यात लोकांचे हित, त्यांचे स्वातंत्र्य कसे अबाधित राहील हेच नजरेसमोर ठेवल्या गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू ऍड प्रकाश आंबेडकर यांनी संविधान सन्मान महासभेचे आयोजन केले होते.त्यात त्यांनी केंद्र सरकारवर कडाडून टीका केली. सध्याचे सरकार संविधान बदलू इच्छित असल्याचा आरोप त्यांनी केला. त्या अनुषंगाने देखील संविधानाबाबत चर्चा व्हायला लागल्या आहेत. तर दुसरीकडे संविधानाचा मूळ गाभा कुणाच्याही बापाला बदलता येणार नाही असे विधान भाजपाचे हेविवेट नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. कायदा- संविधान लवचिक आहे.त्यातील पळवाटा शोधत कायद्याच्या अधीन राहूनच अनेक बाबी घडतात हे देशाने अलीकडच्या काळात बघितले आहे. निवडणूक आयोगाने शिवसेना शिंदेंची असल्याचे सांगून धनुष्यबाण निशाणी शिंदे गटाला देणे असो की आमदार अपात्र प्रकरणात सुप्रीम कोर्टाने जे सांगितले ते पाहू जाता जणू काही विधानसभा अध्यक्षांनी काय निर्णय घ्यायचा त्याच्या गाईडलाईनच दिल्या असा अर्थ निघत असतांना आमदारांनी खरंच पक्षांतर केले आहे का ? हे बघावे लागेल व त्यात कुठलीही घाई न करता कुणावरही अन्याय होणार नाही असे सांगत कायद्याच्या अधीन राहूनच आपण निर्णय घेऊ. असे विधानसभा अध्यक्ष वारंवार सांगताना दिसत आहेत. एकूण कायदा लवचिक असल्याने व तो दुधारी तलवारी सारखा असल्याने तो ज्यांच्या हातात आहे ते त्याचा उपयोग कसा करतात यावर ते अवलंबून असणारे असते.

संविधानाची आपली एक वेगळी गरिमा आहे. तिचे एक पावित्र्य आहे. ते पावित्र्य टिकविणे आणि ते पावित्र्य टिकून राहील याची काळजी घेण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे.

त्यासाठी संविधानाचे महत्व जाणून घेत असतांना त्यापोटी आपली असलेली जबाबदारी आणि कर्तव्ये पार पाडणे,लोकशाहीला मजबूत करणे यासाठी सतत तत्पर व डोळस असणे देखील महत्वाचे आहे. त्यासाठी असेच म्हणता येईल

**भारत देश का जो संविधान है,**
**हर भारतवासी का अभिमान है.**
**जाति-धर्म से ऊपर उठकर सोचना होगा,**
**संविधान की भाषा सबको मिलकर बोलना होगा.**
**मैं सुधरूंगा तो एक सुधरेगा,**
**सब सुधरेंगे तो देश सुधरेगा**

# बने चाहे दुश्मन जमाना हमारा, सलामत रहे दोस्ताना हमारा...

आधुनिक केसरी

**निर्माते यश जोहर यांनी निर्मितीक्षेत्रात पदार्पण करतानाच अमिताभ बच्चन, शत्रुघ्न सिन्हा, झीनत अमान आणि प्राण या बड्या कलावंतांना घेऊन `दोस्ताना' (१९८०) हा चित्रपट निर्माण केला. त्याच्या दिग्दर्शनाची धुरा कसबी दिग्दर्शक राज खोसला यांच्यावर सोपविली. या चित्रपटात प्रेम चोपडा, अमरिश पुरी, हेलन, गजानन जागिरदार, सज्जन, इफ्तेखार, के. एन. सिंह, सुधीर, गोगा कपूर, विकास आनंद, पेंटल, जगदीश राज, मॅकमोहन, शरत सक्सेना, युनुस परवेझ, रुबी मायर, मोहन शेरी आदी सहकलावंत होते. गीतलेखनाची बाजू आनंद बक्षी यांनी सांभाळली होती आणि संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलालद्वयीने दिले होते. या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे विजय वर्मा (अमिताभ बच्चन) आणि रवि कपूर (शत्रुघ्न सिन्हा) हे बालपणापासूनचे जिवलग मित्र.**

आपापल्या कारकिर्दीबद्दल ते एकमेकांशी बोलताना चकार शब्दही काढत नसत. विजय पोलिस अधिकारी तर रवी वकील. विजय गुन्हेगारांना पकडत असे तर रवि त्यांची जामिनावर मुक्तता करत असे. रवि डागाकडे (प्रेम चोपडा) नोकरीला असतो. दोघांचीही वेगवेगळ्या ठिकाणी शीतलशी (झीनत अमान) भेट होते. दोघेही तिच्या प्रेमात पडतात. रवि त्याचे प्रेम तिच्याकडे व्यक्त करतो आणि तीही त्याला प्रतिसाद देते. विजयचे प्रेम मात्र एकतर्फी असते. रवि विजयला तसे सांगतो तेव्हा विजय मनातून उदध्वस्त होतो; पण रवीसाठी आपल्या प्रेमाचा त्याग करण्याचे ठरवतो. पण या दोघांच्या मैत्रीत बिब्बा घालण्यासाठी विजय आणि शीतल एकत्र असतानाचे छायाचित्र डागा रवीला दाखवतो. त्यामुळे गैरसमज निर्माण होऊन विजय व रवि प्रथमच एकमेकांचे प्रतिस्पर्धी बनतात. त्यानंतर डागा आणि विजय यांच्यांत संघर्ष पेटतो. त्यात रवि डागाची बाजू घेतो; पण नंतर जेव्हा त्याला सत्य काय आहे ते समजते तेव्हा तो त्याची भरपाई करतो. **या चित्रपटातील "बने चाहे दुश्मन जमाना हमारा, सलामत रहे दोस्ताना हमारा..."** हे मोहम्मद रफी आणि किशोर कुमार या अद्वितीय गायनप्रतिभेच्या पार्श्वगायकांनी गायिलेले गीत या चित्रपटाचे एक आकर्षण होते. ते विजय (अमिताभ बच्चन) आणि रवि (शत्रुघ्न सिन्हा) यांच्यावर



एका शालेय कार्यक्रमातील पाहुणे या नात्याने चित्रित झाले आहे. प्राचार्य (गजानन जागिरदार) उपस्थित विद्यार्थी व पालकांना त्यांचा परिचय करून देतात आणि रवि प्रथम विजयला सुरुवात करायला सांगतो; पण तो रवीलाच गावयास सांगतो. आणि एक दर्जेदार गीत सुरू होते. आनंद बक्षी यांनी दोन जिवलग मित्रांच्या अतूट मैत्रीचे जे शब्दांकन केले आहे त्याला तोड नाही. ते स्वप्नांचे, पुस्तकांचे दिवस, प्रश्न विचारण्याच्या रात्री आणि त्यांची उत्तरे देण्याचे दिवस होते. आम्ही इथेच अनेक वर्षे घालविली आणि इथेच नाचत बागडत लहानाचे मोठे झालो. कोणी आम्हाला आमचा पत्ता विचारला तर आम्ही सांगतो, की आम्ही एकमेकांच्या ह्रदयातच राहतो. आम्हाला आमच्या मैत्रीची शपथ आहे, की मृत्यूनंतरही आम्ही एकमेकांपासून वेगळे होणार नाही. प्रतिकूल परिस्थिती आली तरी आमची मैत्री अबाधितच राहील, असे हे मित्र जगाला सांगतात. तमाम मित्रांना एकमेकांसाठी हे गीत गाण्याचा मोह व्हावा अशीच चाल लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी त्याला लावली आहे. त्यात त्यानी ग्रुप व्हायोलिन, तबला आणि पियानो यांचा वापर केला आहे

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

# बंगला बांधला हायफाय, पण सुखाचा पत्ता नाही!

आधुनिक केसरी

एकेकाळी माणूस निवाऱ्यासाठी झोपडीत राहायचा. झोपडीत राहणारा प्रत्येक माणूस सुखी व आनंदी



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

जीवन जगायचा आणि म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी झोपडीचे महात्म्य सांगताना म्हटले आहे की,'राजास जी महाली,सौख्य कधी मिळाली;ती सर्व प्राप्त झाली,या झोपडीत माझ्या.' कालांतराने माणसाने घर बांधण्याची कला अवगत केली. झोपडीतला माणूस दगड मातीच्या घरात राहू लागला.नंतर घरावरचे छप्पर मागे पडले आणि टीनचे लोखंडी पत्रे आली. विटा आणि सिमेंटचा शोध लागला.मग दगड मातीची घरे भूतकाळात जमा झाली.शहरांत व खेड्यांत हायफाय बंगले बांधले जात आहेत.खेड्यात ऐपतीप्रमाणे घरे बांधले जात आहेत.परंतु शहरांत व महानगरांत मात्र एकसे बढकर एक असे भव्यदिव्य व अलिशान बंगले बांधण्याची स्पर्धा लागली आहे. कोणी पन्नास लाखाचे घर बांधले की दुसरा एक कोटीचा बंगला बांधतोय.आणि तिसरा दिड ते दोन कोटीचा महल बांधून श्रीमंतीचे प्रदर्शन करतोय.खेदाची बाब अशी की माणसे हायफाय बंगले बांधत आहेत परंतु म्हणावे तेवढे सुख त्या बंगल्यात मिळत नाही. कारण घरे व बंगले आकाराने मोठी झाली पण त्यात राहणाऱ्या माणसांची मने फार लहान बनली आहेत. तसेच नातलगांना अलगद बाजूला केले जात आहे. श्रीमंतीचा थाट दाखविण्याच्या ओघात माणूस स्वार्थी,कंजूस आणि संकुचित वृत्तीचा बनलाय. गरीब व मध्यम वर्गीय लोकांनी शहरात प्लॉट,घर,रो हाऊस,फ्लॅट किंवा बंगलो विकत घ्यायचे म्हटले तर किंमती गगनाला भिडल्या आहेत.म्हणजे गरीबांना व मध्यम वर्गीयांना हायफाय सोसायटीत मुळीच एंट्री नाही. म्हणजे माणूस गरीबीवरुन माणसामाणसांत भेद करतोच पण जात व धर्माच्या नावाने भेद करण्याची परंपरा माणूस आजही सोडून द्यायला तयार नाही हे ठसठशीत असे सत्य आहे.

'घर असावे घरासारखे,नकोत नुसत्या भिंती' या ओळी घराचे घरपण विषद करतात. घरात राहणारी माणसे आजही मिळून मिसळून राहतात, एकत्र बसून जेवण करतात आणि एकमेकांना मदत करतात.बंगल्यात दोन ते चार माणसं राहतात.प्रत्येकाला स्वतंत्र रुम असते.



क्वचित वेळी एकत्र येतात कारण एकत्र यायला,एकत्र जेवण करायला यांना वेळच नसतो.बंगल्यातल्या माणसांचे कपडे,चपला,व इतर दैनंदिन वापराच्या वस्तू महागड्या असतात. पण वर्तन व भाषा उर्मट असते.ही माणसे प्रत्येक गोष्ट पैशाने विकत घेऊ पाहतात.म्हणून ते कधीच सुखी नसतात.जसजसे काळ मागे पडतोय तसतसे घरांची, बंगल्यांची व अपार्टमेंटची संख्या वाढत आहे आणि शेतजमिनीचे क्षेत्र कमी कमी होत आहे. त्यामुळे पर्यावरणाची खूप हानी होत आहे. हे लक्षात न घेता बंगले बांधले जात आहेत. जाता जाता एवढेच सांगावे वाटते की निवारा ही मानवाची मुलभूत गरज आहे. त्यासाठी महागडे व खर्चिक घर बांधण्याची काय गरज?भारतात लाखो लोक बेघर आहेत.तितकेच लोक फुटपाथवर राहतात.अनेक लोक झोपडपट्टीत साधारण घरात राहतात.तुम्ही बंगल्यात राहा, अलिशान घरात वा फ्लॅट मध्ये राहा किंवा झोपडीत राहा.पण मृत्यू नंतर प्रत्येकाला एकाच स्मशानभूमीत जायचे असते.तेव्हा सुखी व समाधानी जीवन जगण्यासाठी बंगलाच असावा असे नाही. समाधानी वृत्तीची माणसे साध्या घरातही सुखी व आनंदी जीवन जगतात.हेच मानवी जीवनाचे खरे लॉजिक आहे.



# 'चला माझ्या ताडोबाला' निसर्ग शिक्षण उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

चालू वर्षात प्रथम ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील व या व्याघ्र प्रकल्पातून पुनर्वसित झालेल्या अशा सर्व गावातील एकूण १२१ शाळेतील ५००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना ताडोबा वनभ्रमंती सोबतच निसर्ग शिक्षणाचे महत्व पटवून देण्यात येईल आणि वने व व्याघ्र संवर्धनाची चळवळ अधिक प्रबळ या माध्यमातून करण्यात येईल . **डॉ .जितेंद्र रामगावकर, (भावसे) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर**

**ताडोबा :** अंधारी व्याघ्र प्रकल्प हे भारतातील एक महत्वाचा व्याघ्र प्रकल्प आहे. या व्याघ्र प्रकल्पाची जैवविविधता सपंन्न व समृद्ध आहे. यामध्ये ८० प्रजातीचे सस्तन प्राणी, २८० पेक्षा पक्ष्यांच्या प्रजाती, ५४ प्रजातीचे संरपटणारे प्राणी, १२५ प्रजातीचे फुलपाखरे, ६७० पेक्षा अधिक वनस्पतीचा प्रजातीने या वनाची समृद्धता वाढवली आहे तर ७९ टक्के वन हे बांबू वनाचे असून वाघाकरिता हा उत्तम असा अधिवास आहे.
सन २०२१-२२ मध्ये झालेल्या व्याघ्र गणनेनुसार या व्याघ्र प्रकल्पामध्ये ८७ वाघाची नोंद झाली आहे.
या वनाचा इतिहास ही महत्वपूर्ण आहे. सन १८७३ पासून वन संवर्धनाची सुरवात झाली आहे. सन १९५५ ला या वनाला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा प्राप्त झाला आहे. सन 1९८६ मध्ये अंधारी अभयारण्य घोषित करण्यात आले आणि सन १९९५ वाघाच्या अधिवास अधिक सुरक्षित व अबाधित राखण्यासाठी या वनाला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देऊन गौरविण्यात आले आहे. या वनाच्या गाभा क्षेत्राचे काटेकोरपणे संरक्षण व संवर्धन व्हावे या हेतूने सन २०१०-११ मध्ये बफर क्षेत्र घोषित करण्यात आले. या बफर क्षेत्रात ९० पेक्षा अधिक गावे असून या ठिकाणच्या वन क्षेत्रात सुद्धा वाघाचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. म्हणून ही गावे व्याघ्र प्रकल्पाच्या विकासात्मक उपक्रमामध्ये जोडण्यात आली. साधारणतः १ लाख लोकसंख्या असलेल्या या क्षेत्रात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजने अंतर्गत विविध सर्व स्तरावर विकासात्मक कामे करण्यात येऊ लागली आणि यातील स्थानिक विद्यार्थ्यांना निसर्ग शिक्षणा सदर्भात जनजागृती व्हावी या करिता "चला माझ्या ताडोबाला" हा महत्वपूर्ण व नावीन्यपूर्ण उपक्रम राबवायला सुरवात झाली. या शिवाय चंद्रपूर जिल्ह्यातील इतर वन क्षेत्रात सुद्धा वाघाचे अस्तित्व मोठ्या प्रमाणात आहे. महाराष्ट्रात २०२२-२३ च्या व्याघ्र गणनेनुसार ४१४ वाघांची नोंद झाली यापैकी २०० पेक्षा अधिक वाघ केवळ चंद्रपूर जिल्ह्यात आहे. म्हणून वाघाचा जिल्हा अशी ओळख जगभर आहे. अशा या जैवविविधने संपन्न असलेल्या व्याघ्र भूमीचे संरक्षण व संवर्धन लोक सहभागाशिवाय शक्य नाही. म्हणून या संरक्षित वनांचे व वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन लोक-सहभागातून व्हावे. स्थानिकांना या माध्यमातून या वनाचे महत्व कळावे आणि विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्यात एक जबाबदार नागरिक म्हणून वन संवर्धन व संरक्षणासाठी योगदाने द्यावे. या हेतून हा निसर्ग संवर्धनातून वन संवर्धन उपक्रम नियमित राबविण्यात येत आहे. याकरिता सन २०१५-१६ पासून ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत बफर क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांसाठी "चला माझ्या ताडोबाला" हा महत्वपूर्ण जन-जागृतीचा कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमाचा उद्देश शालेय विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाविषयी आवड निर्माण करणे आणि वने व वन्यजीव संवर्धनात त्यांचा सहभाग वाढविणे हा होय. या उपक्रमाची सुरवात सन २०१५-१६ मध्ये झाली आणि आजपावतोर ४०००० पेक्षा अधिक बफर क्षेत्रातील तसेच प्रादेशिक वन क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी या ताडोबा वनभ्रमंतीमध्ये सहभाग घेतला आहे. सन २०२२-२३ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील १३५ शाळेतील ५००० विद्यार्थी या उपक्रमामध्ये उत्साहापूर्वक सहभागी झाले होते आणि यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील २७ आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचा सुद्धा सहभाग होता हे विशेष. यावर्षी सन २०२३-२४ मध्ये सुद्धा मा. सुधीरजी मुनगंटीवार, (मंत्री) वने, सांस्कृतिक संचनालय व मत्स्य व्यवसाय महाराष्ट्र राज्य यांच्या सुचनेनुसार दिनांक २९-११-२०२३ पासून या उपक्रमाची सुरवात मुल वनपरिक्षेत्रातील भगवानपूर, फुलझरी, करवण, काटवन व डोणी येथील शाळेपासून होत आहे.

# चाईल्ड केअर संस्थे कडून अन्नधान्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** चाईल्ड केअर सामाजिक संस्था उरण, रायगड हे नाव रायगड वासीयांना नवीन नाही कारण चाईल्ड केअर संस्था आजवर संस्थापक अध्यक्ष विकास कडू यांच्या नेतृत्वाखाली सतत 8 वर्ष समाजाची जाण ठेवून सतत समाज सेवेचे कार्य करत आहे.आणि आजहि करत आहे.
संस्थे तर्फे वेश्वी आदिवासी वाडीतील शाळेत मुलांना आणि वाडीतील भगिनींना अन्न धान्य किट वाटप करण्यात आले.या कार्यक्रमास महामुंबई न्यूज चॅनल चे संपादक मिलिंद खारपाटील व चाईल्ड केअर सामाजिक संस्थेचे मीडिया सल्लागार विठ्ठल ममताबादे, उरण शिक्षक पतपेढी संचालक रमणीक म्हात्रे हे उपस्थित होते.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू यावेळी बोलताना म्हणाले की " हि सेवा म्हणजे ईश्वर सेवा आहे ह्या कार्यक्रमासाठी आदिवासी वाडीतील मुलांना, भगिनींना मदत ज्यांनी ज्यांनी मदत केली त्यांचे सर्वांचे मी संस्थेच्या वतीने आभार मानतो आणी अशीच मदत चाईल्ड केअर सामाजिक संस्थे च्या उपक्रमांना करत राहावे हि विनंती करतो. वेश्वी वाडी व उरण इंदिरा गांधी झोपडपट्टी मध्ये अन्न धान्य किट वाटप करण्यात आले.मी आमच्या संस्थेला ज्यांनी ज्यांनी ह्या कार्यक्रमासाठी हातभार लावला त्यांचे आभार मानतो.हे श्रेय मी सर्व त्यांना देतो कारण त्यांच्यामुळे हा कार्यक्रम आमची संस्था पार पडू शकली "
ह्या कार्यक्रमास वेश्वी वाडीतील शेकडो आदिवासी बांधव उपस्थित होते. तसेच उरण येथील इंदिरा गांधी झोपडपट्टी व वेश्वी वाडीतील शंभर जणांना अन्नधान्य किट वाटप करण्यात आले.या कार्यक्रम प्रसंगी शिक्षक रमणिक म्हात्रे यांनी आपल्या भाषणात सांगितले की ' चाईल्ड केअर सामाजिक संस्था हि अनेक वर्ष उरण मध्ये नव्हे तर रायगड मध्ये समाज सेवेचे कार्य राबवत आहे आणि प्रामुख्याने चाईल्ड केअर संस्था हि आदिवासी वाड्यांमध्ये समाज सेवेचे अधिक कार्य करत आहे त्या साठी संस्थेचे करावे तेवढे कौतुक कमी आहे " सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे मनोज ठाकूर (कार्याध्यक्ष ), हितिक पाटील (उपाध्यक्ष )तुषार ठाकूर (कार्याध्यक्ष ), राजेश ठाकूर (खजिनदार )उद्धव कोळी (सहचिटणीस ), निवृत्ती ठाकूर (उपाध्यक्ष )रोशन घरत (सहखजिनदार )आणि विवेक कडू (सदस्य )यांनी खूप मेहनत घेतली.कार्यक्रमाचे सूत्र संचालन रमणीक म्हात्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे संस्थापक विकास कडू यांनी केले.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना तत्काळ मदत द्या !


## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मागणी : तहसीलदार यांना दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. परिणामी रब्बी हंगामातील पिके उद्ध्वस्त झाली असून शेतकर आथिर्क अडचणीत सापडले आहेत. त्यामूळे नुकसानग्रस्त भागाची तातडीने पाहणी करून पंचनामे करण्यात यावे आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख डॉ. सुधीर कव्हर, उपजिल्हाप्रमुख डॉ. चंद्रशेखर देशमुख,सह, संपर्कप्रमुख विश्वनाथ सानप यांच्या मार्गदर्शनात रिसोडच्या तहसिलदार प्रतिक्षा तेजनकर यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे.

26 व 27 या दोन दिवसांमध्ये रिसोड तालुक्यांमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस झाला आहे. त्यामुळे शेतामधील तूर हरभरा ज्वारी, फळबागे भाजीपाला या शेतातील उभ्या पिकाचे प्रचंड नुकसान झालेले आहे. आधीच प्रचंड अडचणीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर नव्याने अडचण उभी राहिलेली आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी कोलमडला असून शासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी. याकरिता रिसोड तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने जिल्हाप्रमुख डॉ सुधीर कव्हर, उपजिल्हाप्रमुख डॉ चंद्रशेखर देशमुख, रिसोड विधानसभा सह संपर्कप्रमुख विश्वनाथ सानप, सूचनेनुसार रिसोड तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. यावेळी तालुकाप्रमुख नारायण आरू, तालुका समन्वयक घनश्याम मापारी, युवा सेना तालुकाप्रमुख गजानन सानप, महिला आघाडी तालुकाप्रमुख रेखा गाडे, समाधान काठोळे, लक्ष्मण लामने, योगेश सरोदे, शेख वाजिद, नवनाथ मोठे, शेख बाजार, सुधाकर मोरे, अब्दुल, डीलर लक्ष्मण जावळे, सुभाष गव्हाणे, भाऊराव यांच्यासह रिसोड तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी सह तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# क्रांतीसुर्य फाउंडेशनतर्फे सामान्य ज्ञान स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त पहूर येथील क्रांतीसुर्य फाउंडेशनतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी क्रांतीसुर्य फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. क्रांतीसुर्य फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष दीपक जाधव यांनी प्रास्ताविक केले. क्रीडा शिक्षक हरिभाऊ राऊत यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेतील सर्व शिक्षक - शिक्षीका शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. यशस्वीतेसाठी गजानन सोनवणे, भागवत सोनवणे, अनिल घोंगडे, सुनिल पांडव, ज्ञानेश्वर चौथे यांचे सहकार्य लाभले. सुत्रसंचालन स्पर्धा समन्वयक शंकर भामेरे यांनी केले. प्रथम , द्वितीय , तृतीय , उत्तेजनार्थ विजेत्यांना ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येणार आहे.



# अवकाळीमुळे शेती नव्हे; शेतकऱ्यांचे भवितव्यच पाण्यात बुडाले

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** गेल्या दोन-तीन दिवसापासून वाशिम जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस पडत आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील जवळपास सर्वच पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. दिनांक 26 आणि 27 नोव्हेंबरच्या रात्री रिसोड तालुक्यातील अनेक भागात बेमोसमी धुवाधार पाऊस पडला आहे. तर काही ठिकाणी गारांचा पाऊस पडला असल्याची माहिती पुढे आली आहे. तालुक्यातील वाकद कृषी मंडळात 65 मी.मी. च्यावर पावसाची नोंद झाली असल्याची विश्वसनीय माहिती कृषी विभागाकडून मिळाली आहे. तर तालुक्यातील उर्वरित कृषी मंडळात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचून शेताला तलावाचे स्वरूप आले आहे. परिणामी हजारो हेक्टर क्षेत्रातील ऊस, कापूस व तुरीच्या पिकांनी अक्षरशः जमिनीवर लोटांगण घेतले आहे. शिवाय हरभरा, गहू, मोहरी, करडई आदी पीके पाण्यात बुडाली आहेत. तर हळद, डाळिंब, संत्रा, लिंबू इत्यादी बागायती पिकांना सुद्धा अवकाळीचा मोठा फटका बसला आहे. एकंदरीत झालेल्या शेतीच्या नुकसानीकडे पाहून, अवकाळी पावसामुळे " शेती नव्हे; तर शेतकऱ्यांचे भवितव्यच पाण्यात बुडाले" असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे.

यावर्षी पावसाळ्याच्या हंगामात झालेल्या अल्पवृष्टीमुळे खरीपातील मूग, उडीद, सोयाबीन आदी पिकांच्या उत्पन्नात कमालीची घट झाली आहे. त्यामुळे आधीच शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. तर दुसरीकडे रब्बी हंगामातील शेतकऱ्यांच्या अशा आकांक्षांना पावसाने पाण्यात बुडवून टाकले आहे. खरीप हंगामातील एक एकर सोयाबीन सोंगायला साडेतीन ते चार हजार रुपये शेतकऱ्यांना मोजावे लागले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा खिसा खाली झाला. मात्र, उत्पादन खर्च वसूल होण्याइतपत देखील उत्पन्न झाले नाही.तथापि खरिपाची कसर रब्बीत भरून काढू या आशेने आर्थिक संघर्ष करत शेतकरी पुन्हा जोमाने कामाला लागले होते. उसनवारी, उधारी, कर्ज काढून रब्बी हंगामासाठी अत्यावशक असणारी सर्व जुळवा जुळवा करून महिनाभरापूर्वी शेतकऱ्यांनी करडई, हरभरा, गहू आदी पिकांची पेरणी केली होती. सदर पीकं जमिनीच्या पोटातून उगवून नुकतेच बाळसं धरू लागले होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा सुद्धा पल्लवीत झाल्या होत्या. पण पुन्हा निसर्गाला अवकळा सुचली, त्याचा लहरीपणा अवखळला. आणि भर पावसाळ्यात पडला नाही त्यापेक्षा जास्त दिनांक 26, 27 नोव्हेंबर च्या रात्री अवकाळी पाऊस पडला आहे. शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. ऊस, कापूस, तूर ही उभी पिकं भुईसपाट झाली तर, मोहरी, करडई, गहू, हरभरा इत्यादी पीक पाण्यात बुडाली आहेत. हे भयावह वास्तव डोळ्यासमोर पाहून निःशब्द झालेले शेतकरी, " पीक नव्हे; आमचे नशीबच पाण्यात बुडाले..!" अशा मोजक्या शब्दात आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत. बळीराजाची ही व्यथा सरकारने, प्रशासनाने पंचनाम्याचा कुठलाही फार्स न करता सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



**मंजुर करण्यात आलेली पिकविण्याची अग्रीम रक्कम कागदावरच**

खरीप हंगामात झालेल्या नुकसानीची भरपाई तर नाहीच, मात्र पिकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना जी काही 25% अग्रीम रक्कम देण्याचे शासनाने मंजूर केले आहे . ती रक्कम अद्याप कोणाही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही . आश्चर्याची बाब म्हणजे, सदर पिकविमा शासनाने मंजूर केल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधी, तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये श्रेय लाटण्याची जणूकाही स्पर्धाच लागली होती . परंतु सदर मंजूर झालेल्या रकमेचे घोडे आता अडले कुठे ? याची कोणाकडूनही दखल घेतल्या जात नाही . तशीच गत आता रब्बी हंगामातील तूर पिकाचा शेंगा पोखरलेल्या आळीने फडशा पाडल्यानंतर नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसाने संपूर्ण रब्बी हंगामच पाण्यात बुडाला आहे . परिणामी शेती नव्हे ; शेतकऱ्यांचे भवितव्यच पाण्यात बुडाले असल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे . यासाठी पंचनाम्याचा कुठलाही फार्स न करता शासनाने तातडीने व सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी जोर धरत आहे .



वरिष्ठांच्या आदेशानुसार सबंधित नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश त्या त्या विभागातील महसूल कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले आहेत . त्यांनी सादर केलेला अहवाल पुढील कार्यवाहीसाठी त्वरित वरिष्ठांकडे पाठवणार आहे . . !"

**प्रतीक्षा तेजनकर, (तहसीलदार रिसोड )**

# खा. राऊतांनी केली नुकसानीची पाहणी

## अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** अवकाळी पावसामुळे इगतपुरी तालुक्यातील शेत मालाची मोठ्या प्रमाणात नुकसान झाली असुन परिस्थिती भीषण आहे. ही परिस्थिती बघून डोळ्यात पाणी आले आहे. भात पिक व बागायती पिकाची मोठी हानी झाली असुन या वर्षीचे दुसरे कोणतंही उत्पन्नाचं साधन शेतकऱ्यांकडे नाही. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आम्ही सगळे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करत आहे. आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना मदत करण्याच ज्या सरकारच कर्तव्य, ते सरकार मात्र पळपुट आहे म्हणून इतर राज्यात प्रचाराला गेलंय असा घणाघात खासदार विनायक राऊत यांनी केला. इगतपुरी तालुक्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेत मालाचे मोठे नुकसान झाले असल्याने खासदार यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जात नुकसानीचा पाहणी दौरा त्या प्रसंगी खासदार विनायक राऊत बोलत होते. खासदार विनायक राऊत यांनी इगतपुरी तालुक्यातील वाघेरे, पाडळी, गोंदे, वाडीव-हे आदी गावातील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर जात पाहणी केली.

यावेळी माजी आमदार निर्मला गावित यांनी माहिती देतांना सांगितले की, उध्दव ठाकरे सरकारच्या काळात त्यांनी शेतकऱ्यांना खरोखर मदत केली असुन शेतकऱ्यांनी देखील हे मान्य केलं की ठाकरे सरकारच्या काळातील शेतकऱ्यांना कर्जमुक्ती मिळाली. या सरकारच्या काळात मदत मात्र मिळली नाही. दोन दिवसात पडलेल्या अवकाळी व गारपिटीने उध्वस्त झाला आहे. म्हणुन उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत सरकारने जाहीर करावी अशी मागणी यावेळी माजी आमदार निर्मला गावित यांनी केली. या पाहणी दौऱ्याला शिव व्याख्याते नितीन पानगुडे पाटील जिल्हा प्रमुख विजय करंजकर, माजी आमदार निर्मला गावित, महानगर प्रमुख सुधाकर बडगुजर, उपजिल्हा प्रमुख निवृत्ती जाधव, तालुका प्रमुख भगवान आडोळे, तालुका उपप्रमुख राजु नाठे, माजी सभापती सोमनाथ जोशी, प. स. उपसभापती विठ्ठल लंगडे, कचरू पा. डुकरे, मोहन ब-हे, साहेबराव धोंगडे, जेष्ठनेते रमेश गावित, गोविंद गतीर, आंबादास धोंगडे, विष्णु धांडे, विनायक गतीर आदी उपस्थित होते.





# वाकी शिवेश्वर (कन्नड) ते आळंदी पायी दिंडीचे वैजापुरात उत्साहात स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** दरवर्षी कन्नड तालुक्यातील वाकी शिवेश्वर, स्व. नारायणदेव बाबा (कन्नड)येथून पायी दिंडी आळंदीला जात असते हे २३वे वर्ष आहे. २४ नोव्हेंबर २०२३ रोजी वाकी हुन निघालेली ही दिंडी वैजापूरात मंगळवार(ता,२८) रोजी पोहचताच येथील बापूसाहेब गावडे परिवार व वाणी परिवाराच्या वतीने बापूसाहेब गावडे व सौ. शोभा गावडे, जेष्ठ पत्रकार घनःश्याम वाणी, देविदास वाणी, लिमेश(बापू)वाणी व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी त्यांचे पूजन व स्वागत केले. प्रथम दिंडी सोबत असणारे स्व. भावराव महाराज यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उत्तरअधिकारी हभप नामदेव महाराज यांनी उपस्थित नागरिक बंधू भगिनींना उपदेशित केले, रवी गावडे, सौ. सोनाली गावडे, नारायणी सेनेचे अशोक आप्पा पवार, उत्तमराव साळुंके, बाबुराव गावडे, से,नि,पोलिस अधिकारी सोपानराव निकम, रामकिसन जोरे, सोनाजी गोरे, भूषण गावडे, सोपानराव वाणी, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र पा. साळुंके, संतोष वाघ, परसराम आलूले, दिगंबर खंडागळे, दिलीप पा.निखाडे यांनी हभप तुळशीराम महाराज, लोखंडे महाराज, पोपट महाराज यांचे पूजन केले. प्रसाद ग्रहण केल्यानंतर ही दिंडी आळंदीला रवाना झाली. आळंदीला ही दिंडी ८ डिसेंबर,२०२३रोजी पोहचणार आहे.

# वैजापूर येथे थोर समाज सुधारक महात्मा फुले यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सत्य शोधक समाजाची स्थापना करून दीन, दुबळे, अनाथ यांची सेवा करणारे महिलांना मानाचे स्थान देऊन शिक्षणाची दारे उघडणारे व बालसुधारगृह आरंभ करून बालकांचा सांभाळ करून त्यांच्या जीवनात प्रकाश टाकणारे थोर समाज सुधारक महात्मा जोतिबा फुले यांना वैजापूरात मंगळवार(ता.२८) रोजी शहरातील सर्व थरातील नागरिकांनी पुतळा परिसरात एकत्र येऊन अभिवादन केले. भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाअध्यक्ष दशरथ बनकर, समता परिषदचे बाळासाहेब शिंदे, काशिनाथ शेठ गायकवाड, माजी सभापती सजन गायकवाड, सरपंच दौलत गायकवाड, डॉ. सुभाष भोपळे, रतीलाल गायकवाड, ज्ञानेश्वर घोडके, दिलीप अनर्थे, ऋषी जुंधारे, अशोक देवकर, संतोष गायकवाड, धोंडीराम राजपूत, स्वप्नील जेजुरकर, फौजी गौतम गायकवाड, उदय गायकवाड, राम बनकर, धनंजय अभंग बाबासाहेब गायकवाड, भालेराव, गुलाब गायकवाड, अशोक धसे शाहीर अशोक बागुल यांच्या सह शहरातील नागरिकांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. सूत्र संचलन करून माहिती धोंडीरामसिंह ठाकूर यांनी दिली. आभार जगन गायकवाड यांनी मानले.



# स्थानिक गुन्हे शाखेकडून वाहन चोरट्यांवर मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** एका मोटरसायकलच्या चोरीनंतर याबाबत गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक धिवरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेशित करून त्यांनी तात्काळ मोठा गुन्हा उघडकीस आणला आहे त्यात ४ लाख किमतीच्या बारा मोटर सायकली आढळून आल्या आहे. दिनांक २६ रोजी तक्रारदार श्री रविंद्र सुकलाल पारधी यांनी तक्रार दिली की, दिनांक २३ रोजी हिसाळे गावाच्या बसस्टॅण्ड रोडावर उभी असलेली  हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स चोरुन नेली आहे, त्याबाबत थाळनेर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल आहे धुळे जिल्हयातील मोटर सायकल चोरीचे गांभीर्य पाहून मा.पोलीस अधोक्षक, धुळे यांनी यां निरी श्री दत्तात्रय शिंदे, स्थागुशा चुळे यांना चोरीच्या गुन्हयाची उकल होणे बाबत सूचना देवून आदेशीत केले होते

त्याअनुषंगाने माहिती प्राप्त करीत असतांना पो निरी श्री दत्तात्रय शिंदे, यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा हा सागर शामभाऊ मालचे वय-२० याने त्याचे साचर्यादार नामे विजय उदय मालचे, आनंद रघुनाथ मोरे व इकबाल हैदर पिंजारी सर्व रा. वालखेडा ता. शिंदखेडा यांचेसह केला असून ती त्याचे साथीदार नामे विजय मालचे व आनंद मोरे चिंसह गोराणे फाटा येथे असल्याची माहिती प्राप्त झाली त्याअनुषगांने स्वागुशा पथकाने सागर मालचे व त्याचे साथीदार विजय मालये व आनंद मोरे यांच्यासहित त्यांचे ताब्यातील मोटार सायकलसह ताब्यात घेतले आहे. अनेक तालुक्यातील व जिल्ह्यातील एकूण 12 मोटरसायकली जप्त करण्यात आले आहेत असा एकुण त्यांची किंमत ४,००,०००/- रु अशी आहे मोटर सायकाली करण्यात आल्या असून चोरीच्या मोटार सायकलीचे एकुण ०६ दाखल गुन्हे उघडकीस आले आहेत. इतर २६ दाखल गुन्हयाची माहिती प्राप्त करणे सुरु आहे. सदरची कारवाई श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, धुळे श्री किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्री दत्तात्रय शिंदे, स्था.गु.शा. धुळे, पोसई



बाळासाहेच सुर्यवंशी, पोसई अमरजित मोरे,संजय पाटील, संताप हिरे, पंकज खैरमोडे, शशीकांत देवरे, पोना मुकेश वाघ, चेतन बोरसे, प्रशांत चौधरी, महेंद्र सपकाळ,  जितेंद्र वाघ, होल चौधरी,  योगेश जगताप, किशोर पाटील, थापांना केलास महाजन, चापको राजू गिले असांनी केली आहे.



# अबब! महाकाय आकरा फूट अजगरला पकडून प्राणी मित्राने सोडले निसर्गात

आधुनिक केसरी न्यूज

**रायगड :** एका भल्या मोठ्या महाकाय अजगरला विवेक केणी या वन्यजीव प्रेमी प्राणीमित्राने मोठ्या कौशल्याने पकडून वनविभागाच्या मदतीने पुन्हा निसर्गात मुक्त करून त्याला जीवदान दिले ही घटना रायगड जिल्ह्याच्या उरण येथें घडली असून विवेक केणी यांचे सर्वत्र कोतुक होत आहें कळंसुबरे गावातील बंद पडलेल्या राईस मिलच्या आवारात कुत्र्याचे भक्ष केलेल्या अवस्थेत हेभले मोठे अजस्त्र असे अजगर गावाकऱ्यांच्या नजरेस पडताच मोठा ओरडा आरडा झाला घटना स्थळी असणाऱ्या निसर्ग प्रेमी संस्थेचे कार्यकर्ते शिवप्रसाद भेंडे यांनी त्वरित संस्था अध्यक्ष विवेक केणी यांना फोन द्वारे पाचरण केले केणी यांनी वेळ ण घालवता घटनास्थळी जाऊन या अजगरला कोणतीही इजा न होता मोठ्या कौशल्याने पकडले आणि वनविभाग वनरक्षक राजेंद्र पवार यांच्या उपस्तिथ या गावापासून दूर असलेल्या निर्मनुष्य इंद्रायणी जंगलात मुक्त केले सदर अजगर हे चाळीस किलो वजनाचे असून सुमारे आकरा फूट लंबीचे होते सदर अजगरला बघूनच ग्रामस्थांची पळता भुई थोडी झाली होती परंतू सर्प मित्रांनी त्यास पकडून जेरीबंद केल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला एवढा  भला मोठा अजगर पहिल्यांदाच या गावात दिसून आला होता केणी हे गे ली कित्येक वर्ष आपली निसर्गमित्र संस्थेच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात निसर्ग वन्यजीव पर्यावरण वृक्ष संवर्धन संरक्षणाचे कार्य आणि प्रबोधन करत असतात.

# 'माझा वाढदिवस - माझा सन्मान' उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** शालेय जीवनात विद्यार्थ्यांसाठी अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ व्हावी आणि भरीव स्वरुपाची आंतरक्रिया घडून यावी यासाठी शिक्षकांकडून अनेक उपक्रम राबविले जातात. शिक्षक विद्यार्थी आणि विद्यार्थी विद्यार्थी यांच्यात प्रेम, जिव्हाळा, आपुलकी निर्माण व्हावी, शालेय जीवनापासूनच सौहार्दाचे वातावरण निर्माण व्हावे यासाठी जवळा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक ढवळे जी. एस., विषय शिक्षक संतोष अंबुलगेकर, सहशिक्षक संतोष घटकार यांच्या मार्गदर्शनाखाली  'माझा वाढदिवस माझा सन्मान' या उपक्रमास प्रारंभ करण्यात आला आहे. या उपक्रमास चिमुकल्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. इयत्ता दुसरीतील विद्यार्थीनी अपेक्षा गोडबोले हिचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी पालक तथा आकाशवाणीचे प्रासंगिक निवेदक आनंद गोडबोले, मनिषा गच्चे, हैदर शेख यांची उपस्थिती होती. 'माझा वाढदिवस माझा सन्मान' या उपक्रमाला विद्यार्थ्यांमध्ये खूपच प्रभावशाली आहे. ज्या वर्गातील विद्यार्थ्यांचा ज्या दिवशी वाढदिवस आहे त्या वर्गातील मुले मुली परिसरातील पानाफुलांचा बुके तयार करतात. यानिमित्ताने चॉकलेट्स वाटप करण्यात येतात. आनंदक्षणांची देवाणघेवाण होते आणि एकत्वाची भावनाही वाढीस लागते. इयत्तानिहाय व महिन्याप्रमाणे चार्ट तयार करून वर्गाच्या दर्शनी भागात डकविण्यात आला आहे. शैक्षणिक वर्षाच्या अर्धसत्रात जन्मदिनांकाप्रमणे उपक्रम राबविण्यात आला. दीपावली सुट्यांमुळे या उपक्रमास स्थगिती देण्यात आली होती. दुसऱ्या सत्रातही नियोजन करून या उपक्रमास पुन्हा पुन्हा सुरुवात झाली असल्याचे मुख्याध्यापक ढवळे यांनी सांगितले.

# अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करा माजी आ. गावित

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** इगतपुरी व त्र्यंबकेश्वर तालुक्यात मोठ्या प्रमाणात



अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे भात पिकांसह बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसामुळे शेतकरी बांधवांच्या हाती काहीच पिक व उत्पन्न येणार नसल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत तात्काळ दखल घेऊन संबंधित यंत्रणेला पंचनामे करण्याबाबत सूचना कराव्यात अशी मागणी माजी आमदार निर्मला गावित यांनी तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे पिकांना मोठी हानी पोहचून पुर्ण पिक वाया गेले आहे. गेल्या दोन -तीन दिवसांपासून सुरु झालेल्या अवकाळी पावसाने मात्र भात वरईसह बागायती पिकांची मोठी नुकसान झाली आहे. सोंगणीला आलेल्या भात पिकावर मुसळधार पावसाचा मारा बसल्याने उभी असलेली भाताची पीके आड़वी झाली आहे. शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास या अवकाळी पावसाने हिरावून घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

त्यामुळे शेतक-यांच्या नुकसानीची प्रशासनाने दखल घ्यावी. तहसीलदार व जिल्हाधिकारी नाशिक यांनी संबंधित यंत्रणेला पिकांच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना देऊन पिक नुकसानग्रस्त शेतक-यांना दिलासा द्यावा अशी मागणी माजी आमदार निर्मला गावित यांनी तहसीलदार व जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे.



# तरवाडे गावी अंडरपासची सुविधा करण्यात यावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**धुळे :** सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. NH-211 लगत वसलेल्या धुळे तालुक्यातील तरवाडे गावाची लोकसंख्या 4 ते 5 हजारच्या दरम्यान असुन रस्त्याच्या दोन्ही बाजूला नागरिकांची वस्ती असुन एका बाजूला मराठी शाळा, माध्यमिक शाळा व एका बाजूला रेशन दुकान असुन विद्यार्थी व नागरिकांचे नियमित परिसरात वावर असतो, दैनंदिन गरजा व ग्रामस्थांचे हित लक्षात घेता तरवाडे येथे अंडरपासची सुविधा करण्यात यावी यासाठी धुळे जिल्हाधिकारी अभिनव गोयल साहेब  यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले यावेळी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री बाळासाहेब भदाणे व तरवाडे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# लोहा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अवैध धंदा चालू देणार नाही

## पो.नि. चिंचोलकर : अवैध दारू, गुटखा, जर्दा, अनधिकृत मांस विक्रीविरूद्ध कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** लोहा शहर व परिसरात छुप्या पद्धतीने मटका, गुटखा, गुडगुडी, पत्यांचे क्लब, अवैद्य रेती उपसा, अनाधिकृत मांस विक्री पोलीसांच्या नजरा चुकवून अवैध धंदे राजरोसपणे चालत होते.शहरवासीयांच्या भावना लक्षात घेऊन अवैध धंद्याबाबत पुन्हा एकदा तीन दिवसापासून लोहा पोलिसांनी चांगलीच कंबर कसली. पोलीस स्टेशन हद्दीमध्ये कोणत्याही प्रकारचा अवैध धंदा चालू देणार नाही असे पो.नि. ओमकांत चिंचोलकर यांनी आवाहनही केले.

लोहा पोलीस स्टेशन हद्दीत प्रारंभीच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी एक पाऊल पुढे टाकून अनाधिकृत व्यवसायाला आळा घालण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक कार्यवाह्या केल्या शहरवासियांना मोकळा श्वास दिला.

त्यानंतर पुन्हा तिनं दिवसापासून आपली मोहिम सुरू केली.अवैध दारू विक्रीवर शिवणी (जा) येथे छापा मारून एकावर कारवाई करून सदर आरोपींकडून २,२२५ रुपयाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

अवैध गुटखा/अवैध तंबाखू पान मसाला विरोधात कारवाई करत ८ ठिकाणी छापे टाकून ८जनावर गुन्हे दाखल केले.दि.(२८) रोजी मंगळवारी ठराविक ठिकाणी मांस विक्री न करणार्या अवैद्य मटन चिकन दुकानावर पोलिसांनी कारवाई केली.लोहा शहरामध्ये मटन चिकन विकणार्यांना लोहा नगरपालिकेने मोंढ्या मध्ये जागा ठरवून दिलेली आहे. तरी नगरपालिकेने ठरवून दिलेल्या जागी मटन चिकन चे दुकाने न लावता. लोहा शहरामध्ये सर्वत्र दुकाने लावली जातात. यामध्ये मुख्यत्वे करून पालम रोड, कंधार रोड बेरळी रोड गावातील मुख्य रोड, या ठिकाणी दुकाने लावली जातात.या ठिकाणी उघड्यावर दुकाने लावून त्या ठिकाणी सर्वांना दिसेल अशाच पद्धतीने जनावरांची पक्षांची कत्तल केली जाते.त्यातून निघणारी घाण ही तसेच आजूबाजूला पसरलेली असल्याचे निदर्शनास येताच अशा दुकान चालकांना पोलिसांकडून वारंवार नोटीस देण्यात आली होती तरी त्यांनी आपले दुकान नगरपालिकेने ठरवून दिलेल्या जागी लावले नसल्यायामुळे लोहा पोलिसांनी संबंधित ९ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुर्यप्रकाश चन्ना, पीएसआय हालसे, पीएसआय सोनकांबळ, कैलास गीरे,कदम, नाईक, आदींसह पोलीस कर्मचारी यांचा समावेश होता.





# खेळाडूंनी नावलौकिक मिळवावा : डॉ. राठोड

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** मिळावी म्हणून अनेक वर्षापासून दीपावलीनिमित्त खोराड सावंगी (ता. मंठा) येथे क्रिकेटचे सामने आयोजित करण्यात येत आहेत. या सामन्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मुलांना खेळाबद्दल एक संपूर्ण माहिती व्हावी ग्रामीण भागातील खेळाडुंनी तालुका, जिल्हा तसेच राज्यस्तरावर नावलौकिक मिळवावा असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टी सोशल मीडिया प्रदेश कार्यकार्णी सदस्य डॉ.सचिन राठोड यांनी केले. प्रीमियर लीग क्रिकेट सामन्याच्या बक्षीस वितरण समारंभात डॉ. पवार बोलत होते. खोराडसावंगी येथे या स्पर्धेला सुरुवात झाली होती. चार वर्षापासून हा उपक्रम उपक्रम खोराड सांवगी येथील क्रिकेटप्रेमी राबवत आहेत. विजेत्या संघाला रोख व ट्रॉफी सुरेश पवार व डॉ. संतोष पवार, डॉ .दराडे, पंकज राठोड यांच्याहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेत प्रथम बक्षीस सारांग माऊली, व्दितीय बक्षीस जगदंबा इलेव्हन, तृतीय बक्षीस जगदंबा चॅलेंजर या तिन्ही संघांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी खोराड सावंगी प्रिमीयर लींग सीजन चारचे आयोजक उमेश राठोड, अध्यक्ष श्री. जाधव, उपाध्यक्ष सुनील नायक राठोड, कोषाध्यक्ष राजेश पवार, मार्गदर्शक अजय जाधव,सुनील राठोड ,तिन्ही संघाचे संघ चालक जानकिराम चव्हाण शरद राठोड,पंकज राठोड,अतुल राठोड सह गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बूथ सक्षमीकरण कार्यकर्ता मेळावासाठी बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत लासूर स्टेशन येथे बूथ सक्षमीकरण या विषयी कार्यकर्ता मेळावा पार पडणार आहे. त्या अनुषंगाने केंद्रिय अर्थराज्य मंत्री डॉ भागवत कराड साहेब, श्री संजय भाऊ खंबायते जिल्हाध्यक्ष भाजपा, आमदार श्री प्रशांत भाऊ बंब यांच्या मार्गदर्शनाखाली आज भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर नलावडे यांनी रत्नपुर तालुक्यात बाजार सावंगी, सुलतानपूर, काटशेवरी फाटा येथे तालुक्यातील बूथ प्रमुख, शक्तिकेंद्र प्रमूख, वॉरियर्स, लोकप्रतिनिधी, व कार्यकर्ते मित्र यांची संघटनात्मक बैठक घेउन प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सूचना केल्या तसेच बूथ कमिटी स्थापन झाली आहे याची खात्री केली,सरल ॲप डाऊनलोड किती झाले व जास्तीत जास्त सरल ॲप डाऊनलोड करण्यासाठी प्रयत्न करावे असे त्यांनी सांगितले, यावेळी तालुक्यातील बाजार सावंगी येथे श्री प्रभाकर शिंदे माजी उपसभापती,श्री संदीप निकम सरपंच, शिवाजी गायकवाड, सतिष आहेवाड, सुभाष ठोंबरे, काकासाहेब लोंढे, गणेश झुरावत, निलेश गायकवाड, बाळू शेठ नलावडे, संदीप कामठे, अजिनाथ जाधव, सुरेश जाधव, विजय आघाडे, रावसाहेब तांदळे, सत्तार पटेल, विनोद कामठे, संतोष कामठे, सोपान जाधव, आकेश जाधव, माजी सरपंच शिरे , सुलतानपूर येथे श्री योगेश काळे सरपंच, रावसाहेब देशमुख, अंकुश काळे सतिष जैस्वाल, रामेश्वर वेताळ, बाबासाहेब खंडागळे, सतिष खंडागळे, सुखदेव वेताळ अंकल, भागचंद जोनवाल, प्रेमसिंग जोनवाल, शिवनाथ गायके, सुमित भाऊ, काटशेवरी फाटा येथे जिल्हा उपाध्यक्ष श्री प्रकाश वाकळे, गदाणकर साहेब, अनिल करपे, बाबासाहेब औटे , हरिदास म्हसकर, राजू राठोड, यांची प्रमुख उपस्थिती होती.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर